

१९६१0
म. ग्रं. सं. ठाणें
विषय भूप्रवास.
सं. क्र. ४७५.





# भूगोलावरील साहसी प्रवासी

नि. आ. मोडक

REFBK-0017232
REFBK-0017232



पुस्तक २ रें

# भूगोलावरील साहसी प्रवासी

भाग दुसरा

वि. आ. मोडक

दा. क्र. ९०२३२
ग्रं. शाखा (प्रथम प्रत)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ८५२६० वि: भू.प्र.
क्रमांक २८५ 9e13167

REFBK-0017232
REFBK-0017232

संयुक्त साहि
लक्ष्मी रोड, पु

संयुक्त साहित्य

© वि. आ. मोडक, पुणे

प्रथमावृत्ती : १९३६
द्वितीयावृत्ती : १९६७

मुखपृष्ठ :
दलाल आर्ट स्टुडिओ मुंबई
आतील चित्रे
स्टुडिओ सालकर, पुणे

प्रकाशक :
कृष्णनाथ दिनकर कुलकर्णी
३७५ नारायण पेठ,
पुणे २

मुद्रक :
वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय, (प्रा.) लि.,
४०५ नारायण पेठ,
पुणे २

किंमत दोन रुपये

# उल्लेख

ध्रुव-बालकाने आपल्या दृढ तपश्चर्येने या मृत्युलोकाचा कायमचा त्याग करून अनंत आकाशातील अढळ स्थान कसे मिळविले यासंबंधीची सुरम्य कथा आपल्या पुराणात तरी मोठया सुंदर रीतीने व रसाळ वाणीने सांगितली आहे आणि कवींनी काव्ये निर्मिली आहेत. ध्रुवाने मुखाने हरिनामाचा जप करीत व डोळे मिटून रानावनांतून वणवण करीत प्रवास केला; व अखेर नामस्मरणाच्या जोरावर अढळ पद संपादन केले. पुराणातील आकाशस्थ ध्रुवासंबंधी जे सत्य असेल ते असो. पण या भूगोलावरील दोन ध्रुवबिंदूंचा ज्या नरवीरांनी शोध लाविला त्यांच्या साहसपूर्ण प्रवासाचे वर्णन या पुस्तकात मी दिले आहे. ध्रुव-बिंदू गाठल्याने भूगोलावरील मानवांचा विशेष काही दृश्य फायदा झाला आहे अशातील गोष्ट नाही किंवा आज हिमालयाचे अत्युच्च शिखर गौरी-शंकर गाठल्याने स्वर्ग मिळणार आहे असेही नव्हे; पण मानव आपल्या हिमतीने निसर्गावर कसा व किती ताबा मिळवू शकतो याची पारख यामुळे होत जाते, प्रत्येक वेळी मनुष्याच्या सामर्थ्याची कमाल मर्यादा सिद्ध होते व ती सारखी वाढती आहे हीही गोष्ट निदर्शनास येते; हाही फायदा कमी नाही. पर्वत-प्रदेश पादाक्रांत करणारा प्रसिद्ध प्रवासी यंगहजबंड याने अशाच प्रकारचे उद्‌गार एका लेखात काढले आहेत.

पाश्चात्य लोकांच्या अनुकरणाने आपल्याकडे अलीकडे पायी प्रवास करण्याची किंवा दुचाकी, मोटार इत्यादी वाहनांचा अवलंब करून ज्ञात जगावरून लांबलांबची सफर करून येण्याची प्रथा पडू लागली आहे ही गोष्ट खरी. पण आपले तरुण अज्ञात भागी शिरून तो ज्ञात करण्याचे किंवा उच्च शिखरारूढ होऊन स्वर्ग दोन बोटांनी तरी जवळ आणण्याचे कार्य करू लागतील तो सुदिन होय !

या पुस्तकाच्या वाचनाने तरुण मंडळींत असा उत्साह उत्पन्न झाल्यास मी स्वतःला भाग्यवान समजेन. पण अशी वेळ केव्हा येईल तेव्हा येईल.

इ. स. १९५३ साली शिरपा तेनसिंग याने हिलरीबरोबर हिमालयाच्या अत्युच्च शिखरावर मानवी पद ठेवून जरी स्वर्ग गाठला नसला तरी अलौकिक यश मिळविले, ह्या गोष्टीस आता पंधरा वर्षे झाली आहेत.

आज जे पुस्तक मी प्रसिद्ध करीत आहे त्यातील प्रकरणे लेखरूपाने 'लोकशिक्षणा'मध्ये प्रथम प्रसिद्ध झाली होती. हे लेख आपल्या सुप्रसिद्ध मासिकात प्रसिद्ध केल्याबद्दल मी श्रीयुत गणेश गंगाधर जांभेकर, लोकशिक्षणाचे संपादक, यांचा अत्यंत आभारी आहे. त्याचप्रमाणे आज वर्षभर कळ काढून या लेखाची अवशिष्ट मुद्रिते ( off-prints ) जपून ठेवून त्याचे आज पुस्तकात रूपांतर करून दिल्याबद्दल 'समर्थ भारत' मुद्रणालयाचे व्यवस्थापक श्रीयुत सरदेसाई यांचा मी ऋणी आहे.

पुस्तकाची गरज लक्षात घेऊन संयुक्त साहित्य ह्या प्रकाशन संस्थेचे श्री. कुलकर्णीबंधू यांनी द्वितीयावृत्ती अत्यंत आकर्षक स्वरूपात प्रकाशात आणली त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे. सुंदर मुखपृष्ठ काढून दिल्याबद्दल श्री. दलाल, दलाल आर्ट स्टुडिओ, मुंबई, तसेच आतील चित्रे उत्तम काढून दिल्याबद्दल श्री. अनंत सालकर, स्टुडिओ सालकर पुणे, यांचाहि मी फार आभारी आहे. त्याच बरोबर मोहरेदार छपाई करून दिल्याबद्दल विश्वकर्मा मुद्रणालयाचे श्री. राजाभाऊ माटे यांचा मी ऋणी आहे.

शेवटी शाळेच्या चालकांनी व पालकांनीसुद्धा विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालून त्यांची जिज्ञासा जागृत करण्याकरिता या पुस्तकाचा उपयोग करावा अशी त्यांना आग्रहाची विनंती आहे.

पुणे<br>वटपौर्णिमा, शके १८८९

**वि. आ. मोडक**

## अनुक्रमणिका

पृष्ठ

१. उत्तर-ध्रुव-प्रदेश .... १–१७

डॉ. फ्रिड्ज्योफ नॅन्सेन्

डॉ नॅन्सेन् यांचे उत्तर-ध्रुव बिंदूकडे प्रयाण

२. ध्रुव-प्रदेशांचा शोध .... १८-३२

अखेर उत्तर-ध्रुव बिंदूवर
कॅ. रॉबर्ट एडविन् पेअरी

३. दक्षिण-ध्रुव-प्रदेश .... ३३–५२

पूर्ववृत्तात

कॅ स्कॉटची पहिली सफर


४. ध्रुव-प्रदेशांचा शोध .... ५३–७१

कॅ. शॅकलटन् याची दुसरी सफर

भाग्यशाली कॅ. रोल्ड अमुंडसेन

कॅ. स्कॉट व त्याचे अनुयायी

# ध्रुव-प्रदेशांचा शोध


पॅसिफिक महासागर
बेरिंग समुद्र
अलास्का
आर्क्टिक महासागर
उत्तर ध्रुव बिंदु
हडसनचा उपसागर
ग्रीनलंड
आइसलँड
उत्तर वृत्त
स्पिट्स्बर्जेन
हॅमरफेस्ट
स्कँडिनेव्हिया
युरोप
आशिया
अटलांटिक महासागर
नॅनसेन व जॉनसेन यांचा प्रवास
फ्रॅम जहाजाचा मार्ग
पेरीचा मार्ग

दा. क.
शाखा (स्थळ प्रत)

# उत्तर-ध्रुव-प्रदेश

कोलंबसाने वेस्ट इंडीज बेटांचा शोध लाविला आणि अमेरिगो व्हेस्प्यूसी, पितापुत्र जॉन कॅबो व बॅस्टिन् कॅबो, सर वॉल्टर रॅले, सर जॉन् हॉकिन्स् इत्यादी बऱ्याच साहसप्रिय प्रवाशांना अॅटलांटिक महासागरापलीकडील प्रदेश मोकळा करून दिला. आफ्रिका खंडाच्या पश्चिम किनाऱ्याचे दक्षिण टोक बार्थोलोम्यू डायस यास सापडले; व त्या टोकास वळसा घालून वास्को-ड-गामा व इतर अनेक पाश्चात्त्य प्रवासी धडाडीने हिंदुस्थान व ईस्ट इंडीज बेटे यांकडे धाव घेऊ लागले. फर्डिनंड मॅगेलनने पहिली पृथ्वीप्रदक्षिणा पार पाडताच सर फ्रॅन्सिस् ड्रेक, लॉर्ड अॅन्सन्, कॅप्टन् कुक् वगैरे प्रवासप्रिय वीरांना पृथ्वीप्रदक्षिणेचे वेडच लागले! कुकने तर तीन वेळा पृथ्वीप्रदक्षिणा पार पाडली. उत्तर अमेरिका, मध्य अमेरिका, वेस्ट इंडीज्, दक्षिण अमेरिका, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, तास्मानिया, न्यू झीलंड आणि ईस्ट इंडीज बेटे इत्यादी नव्या नव्या भूप्रदेशांच्या अंतर्गत भागांचा शोध कमीजास्त प्रमाणात करण्याचा काहींनी विडाच उचलला. तथापि चीन, हिंदुस्थान आणि आशियाच्या आग्नेय दिशेस असलेली ईस्ट इंडीज ऊर्फ मसाल्याची बेटे, यांच्याकडे जाण्याचा शक्य तितका जवळचा मार्ग शोधून काढण्याची तळमळ व

स्पर्धा पाश्चात्त्य राष्ट्रांत सर्वांनाच सारखी लागून राहिली होती. कोणाच्या मते यूरोपच्या वायव्य दिशेने, तर कोणाच्या मते त्याच खंडाच्या ईशान्य दिशेने जवळचा मार्ग सापडेल अशी खातरी असल्यामुळे त्यांनी त्या त्या मार्गांनी खटपट चालविली. मार्टिन् फ्रॉबिशर, जॉन डेव्हिस, हेन्‌री हड्‌सन्, जॉन् फ्रँक्लिन, कॅ. मॅक्लूअर इत्यादी प्रवाशांनी या कामी आपल्या प्राणांचीही क्षिती न बाळगता उत्तर अमेरिकेचा उत्तर किनारा शोधून काढला. त्याचप्रमाणे सर विल्बी, रिचर्ड चॅन्सेलर, बॅ. बेरिंग, बॅ. नॉर्डेन्‌स्किओल्ड इत्यादी नाविकांनी यूरेशियाचा उत्तर किनारा शोधून काढला व उत्तर अमेरिकेचे पश्चिम टोक आणि आशियाचे पूर्व टोक या भूशिरांमधील सरासरी अंतर अवघे ३८ मैलांचेच आहे, ही आश्चर्यकारक गोष्ट सिद्ध केली.


आश्चर्यकारकच ! कारण, फर्डिनंड मॅगेलन याला मध्य अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यापासून आशियाच्या पूर्वेकडील ईस्ट इंडीज बेटापर्यंत यावयास पॅसिफिक महासागरावरून सुमारे ७००० मैल अंतर तोडून जावे लागले होते. असो. परिसाच्या शोधार्थ ज्याप्रमाणे रसायनशास्त्र निर्माण झाले, त्याचप्रमाणे मसाल्याच्या शोधार्थ अखिल पृथ्वीचा शोध लागून पृथ्वी गोल आहे, ही गोष्ट प्रत्यक्ष अनुभवाने कायमची ठरली ! तिचा विषुववृत्तावरील परीघ सुमारे २५००० मैल आहे हेही निश्चित झाले. पण ज्या काल्पनिक आसाभोवती पृथ्वी स्वांगपरिभ्रमण करते, त्या आसाचे दोन स्थिर बिंदू म्हणजेच जे उत्तर ध्रुव व दक्षिण ध्रुव, ते शोधून काढण्याची आणि त्या ठिकाणच्या प्रदेशाची रूपरेषा ठरविण्याची ईर्षा अनेक नाविकांच्या मनात उत्पन्न होऊ लागली. प्रत्येक ज्ञात प्रदेश पादाक्रांत करण्याची आणि तो बेचिराख करून किंवा तेथे रक्ताचे पाट वाहवून त्यावर आपले स्वामित्व प्रस्थापित करण्याची अघोर महत्त्वाकांक्षा ज्याप्रमाणे काही शूर नरराक्षसांमध्ये असते, त्या नरराक्षसांपेक्षा अज्ञात

प्रदेशांचा शोध लावीत असता तेथील अनपेक्षित, म्हणूनच अधिक भीषण व प्राणघातक संकटांशी तोंड देण्यास तयार होण्याची ईर्षा धरणारे नरवीर कितीतरी पटीने श्रेष्ठ होत! ध्रुव-प्रदेशांचा शोध लावण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारे पुरुषश्रेष्ठ, म्हणजे डॉ. नॅन्सेन्, कमॅन्डर पेरी, सर अर्नेस्ट शॅकलटन्, कॅ. स्कॉट आणि कॅ. अमुन्डसेन् हे प्रमुख होत. या पुस्तकात आपल्याला या प्रवासप्रिय व धाडसी नरशार्दूलांनी लाविलेल्या शोधांची सत्यसृष्टीतील, पण अद्भुतरम्य व रोमांचकारी हकीकत समजून घ्यावयाची आहे.*

दिव्याची प्रज्वलित ज्योत पाहताच तिच्यावर एकदम झडप घालावी, असा ज्याप्रमाणे पतंगाला अनावर मोह होतो, त्याप्रमाणे या प्रवासप्रिय भूगोलशोधकांना पृथ्वीवरील ध्रुवबिंदूंना प्राणांची आहुती देऊनही एकदाचे गाठावे, अशी विलक्षण मोहिनी पडली. या ध्रुवबिंदूंनी त्यांना खरोखर वेडच लाविले! तथापि हा प्रवास करणे म्हणजे प्राणघातक संकटांच्या माहेरघरी जाणे होय. कारण ध्रुवबिंदूच्या भोवतालचा प्रदेश केवळ असंख्य व अजस्र हिमखंडांच्या थरांनी बनलेला आहे. सगळीकडे हिमच हिम! पर्वत, शिखरे, कडे, पठारे, नद्या, खोरी ही सर्वच हिममय, नव्हे काही काही ठिकाणी हिमाचीच झालेली! गोठलेल्या समुद्रावर हिमराशी एकीवर एक रचूनच उत्तर ध्रुव-प्रदेश बनलेला आहे, आणि त्याच्या सभोवती अमेरिका व यूरेशिया या भूखंडांचा तट आहे. दक्षिण ध्रुव-प्रदेश हा उंचसखल भूभागांचा असला तरी त्यावर हिमाचे जाड असे थरावर थर साचले आहेत. या घनदाट बर्फाच्छादित भूप्रदेशा-भोवती पॅसिफिक, ॲटलांटिक व हिंदी या तीन महासागरांचे वेष्टन आहे. या हिममय प्रदेशावरून जावयाचे म्हणजे उन्हाळ्या दिवसात ज्या वेळी गोठलेला समुद्र मोकळा होतो त्या वेळी जहाजातून. पण जर का हे

*या माहितीकरिता लेखकाने अनेक पुस्तकांचा उपयोग केला आहे.

जहाज हिवाळ्या दिवसांत या भागातच राहिले तर ते गोठलेल्या समुद्रात अडकून राहते, व पुनः समुद्र वितळेपर्यंत मोकळे होत नाही ! हिवाळ्यात जहाज अडकून पडलेले एक वेळ पत्करते; पण उन्हाळ्यात काही गोठलेला भाग मोकळा होत असला, तरी या भागातून प्रचंड हिमगीरी इतस्ततः प्रवाहामुळे व वादळामुळे द्रुत गतीने जात येत असतात. अशा वेळी जर एखाद्या जहाजावर हा हिमगीरी आदळला, तर त्या जहाजाचा




कचाचुराडाच झाला म्हणून समजावे ! १९१२ साली 'टिटॅनिक' नावाच्या नावाप्रमाणेच अजस्र व सर्व आधुनिक सुखसोयींनी नटलेल्या एका अगदी नव्या कोऱ्या बाष्पनौकेचा—अटलांटिक महासागरातून ती प्रथमच जात असता व सर्व जगाचे डोळे तिच्या प्रवासवृत्ताकडे अचंब्याने लागले

असता—अशाच एका हिमगिरीने चुराडा केला व तिला जलसमाधी दिली! तर मग चिमुकल्या नावा, होड्या व जहाजे यांचा या जलराक्षसांपुढे काय पाड ?

हिममय प्रदेशातून प्रवास करावयाचे खरे साधन म्हणजे लाकडी बिनचाकी घसरणारी गुळगुळीत गाडी. हिला हिम-कुत्री किंवा हिम-हरिणे जोडतात. काही काही वेळा लाकडी जोड्यांच्या साहाय्यानेही हिमाच्छदित प्रदेशावरून घसरत जाता येते. हे जोडे आठ फूट लांब व चार इंच रुंद अशा लाकडी फळीचे केलेले असतात. काही दिवसांच्या अभ्यासाने या जोड्यांच्या साहाय्याने घसरत जाण्याची कला संपादन करता येते व अनुभवाने तीत प्रावीण्यही मिळविता येते. घसरत जाणाऱ्या गाडीने अथवा जोड्यांनी प्रवास करण्यातही एक मोठा धोका असतो. या बर्फमय प्रदेशात काही काही ठिकाणी मोठमोठी खोल खिंडारे असतात. यात जर एखादा प्रवासी पाय घसरून पडला तर त्यातच तो गारठून गाडला जातो. ही एक प्रकारची हिमसमाधीच होय! या प्रदेशात मधून मधून गारांची भयंकर वादळेही होतात; आणि अशा वादळात सापडल्यावर त्यांच्या प्राणहारक माऱ्यांतून जिवंत सुटणे दुरापास्तच. अनेक प्रवासी अशा तऱ्हेने बेपत्ता झालेले आहेत. आणखीही एकदोन प्रकारची गंडांतरे या प्रदेशातील प्रवाशांना अनुभवावी लागतात. पण ती एकाएकी उद्‌भवत नाहीत. या प्रदेशांत प्रवाशाच्या शरीराचा कोणताही भाग उघडा पडता कामा नये. नाहीतर त्या भागाचे थंडीने लचके पडतात व भयंकर जखमा उद्‌भवतात. त्याचप्रमाणे अतिशय दमूनभागून प्रवाशाने निजता कामा नये. कारण, शरीराची जोपर्यंत हालचाल चालू असते, तोपर्यंत त्याला सभोवतालचा गारठा बाधत नाही. पण निद्रावश झाल्यामुळे त्याच्या शरीराची हालचाल थांबते; आणि अशा वेळी जर तो गारठ्यात निजला तर जागच्या जागीच गारठून त्याला अखेरची झोप लागते!

असो. अशाही प्राणघातक व संकटमय प्रदेशाचे आव्हान स्वीकारून वर सांगितलेल्या धाडसी प्रवाशांनी ध्रुवबिंदूंचा शोध लावण्याचे काम पत्करले.

## डॉ. फ्रीड् ज्योफ नॅन्सेन्

नॉर्वे देशाची जुनी राजधानी क्रिस्टियानिया या शहराजवळ सन १८६१ साली या साहसी प्रवाशाचा जन्म झाला. वयाच्या एकविसाव्या वर्षी त्याने आपले विद्यापीठातील शिक्षण पूर्ण केले व प्राणिशास्त्राचा विशेष अभ्यास करण्याकरिता म्हणून ग्रीनलंड बेटाच्या पूर्व किनाऱ्यापर्यंत प्रवास केला. या ध्रुवसन्निध प्रदेशातील प्रवासामुळेच थेट ध्रुवापर्यंत प्रवास करण्याची त्याला स्फूर्ती मिळाली. नॅन्सेन्च्या अंगी दुसरेही पुष्कळ गुण होते. तो ज्याप्रमाणे बऱ्याच वरच्या दर्जाचा शास्त्रज्ञ होता त्याचप्रमाणे तो मल्लविद्येतही प्रवीण होता; आणि हिमप्रदेशावरून लाकडी जोड्यांच्या साहाय्याने घसरत जाण्याच्या कलेतही निपुण होता. शिवाय जात्या धीरोदात्त वृत्तीचा असल्यामुळे कोणत्याही संकटास तोंड देण्यास तो डगमगत नसे; आणि या गुणसमुच्चयामुळेच उत्तर महासागराच्या मध्यभागी असलेल्या व हिमतटांनी दुर्गम केलेल्या ध्रुवबिंदूचा छडा लावण्याची महत्त्वाकांक्षा त्याच्या मनात उद्भवली. पण प्रत्यक्ष ध्रुवबिंदूकडे जाण्यापूर्वी ग्रीनलंड बेट पूर्वेकडून पश्चिमेकडे ओलांडून जाण्याचे कार्य त्याने हाती घेतले. ग्रीनलंड बेट म्हणजे एक हिमाच्छादित सुमारे ८००० फूट उंचीचे पठार आहे. नॉर्वे द्वीपकल्पाच्या पश्चिम किनाऱ्यावर ज्याप्रमाणे उंचउंच तुटलेले कडे आहेत, त्याप्रमाणे याच्याही पूर्व किनाऱ्यावर आहेत; मात्र हे कडे नेहमी हिमाने मढलेले असतात. कधी कधी या कड्यांवरून हिमाचे डोंगरही खाली कोसळून पडतात; आणि हेच हिमगिरी दक्षिणेकडे शीतप्रवाहाबरोबर ॲटलांटिक महासागरात वाहत येतात. ग्रीनलंड बेटाचा


दक्षिण व पश्चिम किनारा त्या मानाने सखल आहे व तेथे एस्किमो लोकांच्या वसाहतीही आहेत. नॅन्सेनने आपल्याबरोबर आपल्याच देशातील तिघा सोबत्यांना व दोन लॅप्लंडमधील रहिवाशांना घेतले आणि ता. ९ मे सन १८८८ या रोजी ग्रीनलंडच्या सफरीवर कूच केले.

ही सफर करण्यामध्ये त्याचा मुख्य हेतू असा होता की, हिमप्रदेशावरून जोड्यांच्या व बिनचाकी गाड्यांच्या साहाय्याने प्रवास करता येतो की नाही हे पाहावे आणि अशा प्रवासात येणाऱ्या मुख्य अडचणींचा व संकटांचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा, म्हणजे ध्रुवप्रदेशावर स्वारी करण्यास त्याचा पुष्कळच उपयोग होईल. त्याने अशा प्रवासात नेहमी अतिशय उपयोगी पडणारी हिम-कुत्री किंवा हिम-हरिणे यांनादेखील आपल्याबरोबर घेतले नाही. कारण, केवळ मनुष्यप्राण्यालाच वेळप्रसंग आल्यास अशा प्रवासात कितपत तग धरता येतो हेही त्याला अजमावून पाहावयाचे होते. नॅन्सेन् आपल्या अनुयायांसह एका डॅनिश बोटीतून प्रथम उत्तर-वृत्तावरील व ग्रीनलंडच्या पूर्वेस असलेल्या आइसलंड या बेटापर्यंत आला. तेथून पुढे एका मच्छीमारीतून ग्रीनलंडकडे ते निघाले. पण ग्रीनलंडच्या किनाऱ्याजवळून जाणाऱ्या शीतप्रवाहातून बरेच लहान मोठे हिमखंड एकसारखे वाऱ्याच्या जोरामुळे वेगाने वाहत जात असल्या-कारणाने यांना किनारा गाठावयास अतोनात त्रास होऊ लागला. जहाजास पुढे जाणे अशक्य झाल्यामुळे त्यांनी ते तेथेच सोडून दिले; आणि त्या-वरील चिमुकल्या नावा व बिनचाकी गाड्या पाण्यात लोटून व तरंगत्या हिमखंडावर आरोहण करून त्या हिमखंडाच्या मदतीने ता. २८ जुलै १८८८ रोजी त्यांनी एकदाचा ग्रीनलंडचा किनारा गाठला! पण ते ठिकाण उतरावयास फारसे सोईचे नसल्यामुळे ते तेथून थोडेसे उत्तरेकडे किनाऱ्या-किनाऱ्याने गेले. जवळ त्यांना एस्किमो लोकांची वसाहत आढळली; तेव्हा पाहुण्यांना पाहून एस्किमो लोकांना व एस्किमो लोकांना पाहून पाहुण्यांना

अतिशय आनंद झाला. ता. १० ऑगस्ट रोजी त्यांनी आपले तंबू याच ठिकाणी ठोकले व नॅन्सेन् याने दिवसभर आजूबाजूस फिरून प्रदेशाची पाहणी केली. तेथील तो विचित्र व भयानक देखावा पाहून नॅन्सेनला गांगारल्यासारखेच झाले असावे. नुकत्याच पडलेल्या हिमकणांचे भुसभुशीत थर, मधूनच उंच गेलेले निमुळते सुळके, मध्यभागी पडलेली खोल खिंडारे, दोन कड्यांना जोडणारे बर्फाचे अरुंद पूल व सगळीकडेच एकजात पांढरा पांढरा शुभ्र प्रदेश, असे हे भीषण दृश्य पाहून कोण गांगरणार नाही?

ता. १५ ऑगस्ट रोजी नॅन्सेनने आपल्या सोबत्यांसह हे हिमपठार ओलांडण्यास सुरुवात केली. हिम-भगदाडात चुकून पाय घसरून पडल्यास आतच समाधी मिळू नये म्हणून प्रत्येकाने आपल्या कमरेभोवती दोरखंड बांधिला होता व त्याचे एक टोक बिनचाकी गाड्यास बांधून ठेविले होते. हा प्रदेश इतका उंचसखल होता की, या प्रदेशावरून बिनचाकी गाडी आपल्याबरोबर ओढीत नेण्यास त्यांना अतिशय श्रम पडत व सबंध दिवसाकाठी जेमतेम पाचसहा मैलांचीच त्यांची मजल पडे. सप्टेंबर महिन्याच्या २ तारखेस ग्रीनलंडचे ८,००० फूट उंचीचे पठार त्यांनी एकदाचे गाठले व पुढे त्यांचा प्रवास थोडासा सुलभ झाला. पण हा सर्व प्रवास निर्जन—ना पशू ना पक्षी—अशा ओसाड प्रदेशातून चालला होता. रात्रीची थंडी बाधू नये व अंग बधिर होऊ नये म्हणून ते शक्य तितकी काळजी घेत. आपल्या तंबूत ते हिम-हरिणांच्या एका पिशवीत जोडी जोडीने निजत. तथापि केव्हा केव्हा वाऱ्याचा जोर, गारांचा मारा व थंडीचा कडाका इतका भयंकर होत असे की, त्यांना तंबू उभा करणे किंवा उभा केलेला खाली पडू न देणे अशक्यच होत असे; आणि आश्चर्याची गोष्ट अशी की, या सर्व दगदगीमुळे व श्रमामुळे त्यांचा जीव तहानेने व्याकुळ झाला असता या हिममय प्रदेशात त्यांना पिण्यास पुरेसे पाणी-देखील मिळत नसे! त्यामुळे बऱ्याच दिवसांनी पठार उतरून पश्चिम

किनाऱ्याजवळ ज्या वेळी ते आले, त्या वेळी त्यांना गोड्या पाण्याचे एक सरोवर आढळले असता किती पाणी व ते किती वेळा पिऊ, असे त्यांना होऊन गेले यात काय नवल? ता. १९ सप्टेंबर रोजी त्यांनी



पश्चिम किनारा गाठला व त्यांच्या आनंदास सीमा राहिली नाही! तेथून एक चिमुकली नौका तयार करून तिच्या साहाय्याने किनाऱ्यावरचे प्रसिद्ध गॉड्थाआब या एस्किमो लोकांच्या वसतिस्थानी ते आले. या प्रवासामुळे डॉ. नॅन्सेन् यास हिमप्रदेशातून प्रवास करण्याचे चांगलेच ज्ञान मिळाले व या ज्ञानाचा उपयोग त्याला पुढील प्रवासात फारच झाला, हे सांगावयास नकोच.

## डॉ. नॅन्सेन् याचे उत्तर-ध्रुवबिंदूकडे प्रयाण

ग्रीनलंड ओलांडून जात असता डॉ. नॅन्सेन् यास समुद्रातील प्रवाह व वातावरणातील वारे यांच्या वाहण्यासंबंधी काही ठोकळ नियम असावेत, अशी एक कल्पना सुचली होती. या कल्पनेला अनुसरून त्याने आपल्या मनाशी असा एक कयास बांधला की, उत्तर महासागरातील एका प्रवाहाच्या साहाय्याने ध्रुवबिंदूपर्यंत जहाज नेता येईल. त्याने हा अंदाज प्रत्यक्ष अजमावून पाहण्याचा आपला बेत जाहीर केला; आणि या कामगिरीवर जाण्याकरिता म्हणूनच त्याने 'फ्रॅम्' नावाचे एक विशेष प्रकारच्या बांधणीचे जहाज तयार केले. जहाजाच्या तळाला गोलाकार देऊन वरच्या बाजू दबल्या जाऊ नयेत म्हणून त्या रुंद व जाड तुळईने जोडल्या होत्या. म्हणून हिमाच्या थराचा कितीही दाब या जहाजाच्या बाजूवर पडला तरी त्या दाबाने त्याची दामटी होणे शक्य नव्हते. उलट ते त्या दाबामुळे वरवरच उचलले जावे, अशा प्रकारची त्याची बांधणी त्याने केली. शिवाय त्या जहाजाचे लाकूडही अतिशय बळकट व टिकाऊ असे पैदा केले होते. या जहाजाचे वजन सारे ४०० टनच भरले! जहाजावर १२ माणसांना निदान ५ वर्षे तरी पुरे पडेल इतका टिकाऊ अन्नाचा साठा त्यांनी जवळ घेतला. ध्रुवप्रदेशात सहा सहा महिने अंधारात घालवावे लागतात. अशा वेळी विजेचा प्रकाश मिळावा म्हणून वीज उत्पन्न करण्याकरिता एक 'डायनॅमो' ही त्यांनी बरोबर घेतला. पोशाखाच्या बाबतीतही नॅन्सेनने पुष्कळ सुधारणा केल्या. कमी कपड्यांत जास्त ऊब आणावयाची, अशा प्रकारची ही सुधारणा होती. अशा तयारीनिशी ता. २४ जून १८९३ रोजी आपल्या बारा उत्साही, धीट व बळकट अनुयायांसह डॉ. नॅन्सेन् निघाला.

नॉर्वेच्या पश्चिम किनाऱ्याने जात असता पुष्कळच नॉर्वेजियन् लोकांनी त्यांचे जागोजाग मनापासून स्वागत केले व हाती घेतलेल्या कामी

पूर्ण यश मिळो, अशी सदिच्छा प्रगट केली. नॉर्वेचे उत्तर टोक जे उत्तर भूशिर त्यास वळसा घालून थेट पूर्वेस वैगाटस या बेटास त्यांचे जहाज येऊन लागले. उत्तर टोक सोडल्यापासून त्यांना हिम-खंडापासून त्रास होऊ लागला. वैगाटस बेटावर त्यांनी सुमारे ३४० एस्किमो जातीचे पांढरे शुभ्र कुत्रे आपल्याबरोबर घेतले. यदाकदाचित आपल्या अंदाजाप्रमाणे जर ध्रुवबिंदूकडे जाणारा प्रवाह आढळला नाही, तर बर्फावरून पायीच जावयाचे असे नॅन्सेनने ठरविले होते; व त्या वेळी या कुत्र्यांचा उपयोग व्हावा म्हणून त्याने ही पूर्वयोजना करून ठेविली होती. हा ऑगस्टचा महिना होता. येथील हा काळ म्हणजे वसंतऋतू संपून ग्रीष्मऋतूचा भर होय. पण येथील उन्हाळा म्हणजे आपल्या हिवाळ्याहून थंडच! तथापि या वेळी यूरेशियाच्या उत्तरेकडील सर्व विस्तृत सखल भाग नानातऱ्हेच्या उमललेल्या चिमुकल्या चिमुकल्या फुलांनी फुलून गेला होता. तो नयनमनोहर देखावा पाहून डॉ. नॅन्सेन् याला व त्याच्या बरोबरच्या लोकांना जितका आनंद झाला तितकेच आश्चर्यही वाटले; आणि येथील अपूर्व शोभा पाहण्याकरिता ते आळीपाळीने या मुख्य भूभागावरून सहल करून आले. पुढे ते कारा समुद्र ओलांडून आशियाखंडाचे उत्तर टोक जे चेल्युस्किन् भूशिर तेथपर्यंत आले. वाटेत त्यांनी २१ हिम-हरिणे व दोन शुभ्र अस्वले पकडली. चेल्युस्किन् भूशिरावर त्यांनी एक दिवस तर मोठ्या मौजेत घालविला आणि खाण्यापिण्याची चंगळ केली. या ठिकाणी त्यांना वॉलरसचे थवेच्या थवे भेटले. त्यांचे सुळे पाहून त्यांना भीतीच वाटली. तथापि त्यांनी एक-दोन प्राण्यांची शिकार करून त्यावरच त्या दिवशी मेजवानी झोडली.

सप्टेंबर महिना संपला. त्याबरोबर हिम-खंडांची संख्या झपाट्याने वाढू लागली व त्यांचे जहाज रिआकोव्ह बेटापर्यंत आले. समुद्र गोठल्यामुळे त्यांचे 'फ्रॅम' गलबत बर्फात रुतून बसले! तेव्हा पुन: बर्फ वितळून गलबत मोकळे होईपर्यंत तेथेच राहणे त्यांना भाग पडले. आपल्याबरोबर

आणलेला डायनॅमो चालविण्याकरिता त्यांनी पवनचक्की उभी केली. ऑक्टोबर महिना तर फारच काळजीत गेला. कारण, बर्फाचे थर वाढतच होते; व त्यांच्या भाराखाली जहाज टिकाव धरते की नाही, याची परीक्षाच व्हावयाची होती. पण क्रमाक्रमाने जहाज वर उचलले जाऊन ते सुरक्षित राहिले. सभोवतालचा देखावा मात्र भयप्रद होता. बर्फाच्या राशी एकमेकांवर पडत व आदळत, तेव्हा जो प्रचंड ध्वनी उमटे त्यामुळे दश दिशा दणाणून जात. नोव्हेंबर महिन्याच्या २ तारखेस तेथे नभोमंडळात जो एक अपूर्व बहुरंगी प्रकाश त्यांनी पाहिला त्याचे वैभव अगदी अवर्णनीय होते – किती तरी वेळ हे नाविक लोक तो देदीप्यमान रंगीबेरंगी देखावा स्तब्धपणे पाहत होते !

नाताळचा मुख्य दिवस उजाडला; आणि हा दिवस त्यांनी नानाप्रकारचे खेळ खेळणे, शर्यती लावणे, गाणी गाणे व मनमुराद खाणे-पिणे यात घालविला. नंतर अर्थात १८९४ साल उजाडले. पुनः एकवार बर्फाचे थर वाढू लागले; आणि पुनः एकदा जहाजाचा बळकटपणा प्रत्ययास आला. बर्फाच्या खालून प्रवाह वाहत होता व तो हळूहळू का होईना, पण उत्तरेकडेच वाहत होता. फेब्रुवारी महिन्याच्या २ तारखेस ' फ्रॅम ' गलबताने ८० वे अक्षवृत्त ओलांडले असल्याचे डॉ. नॅन्सेनच्या लक्षात आले, तेव्हा सर्व लोकांना अत्यानंद झाला. हे अक्षवृत्त ओलांडल्यावर मात्र जहाज बर्फाखालील प्रवाहाबरोबर पश्चिमेकडेच जाऊ लागले; वाटेत फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस गारांचे मोठेच वादळ झाले. वाऱ्यांचा अनावर जोर व गारांचा विलक्षण मारा यामुळे त्यांची दाणादाण झाली. जहाजावरील नावा उलटून पडल्या व बिनचाकी गाड्या गारांच्या ढिगाखाली अडकून बसल्या ! मार्च, एप्रिल, मे व जून हे चार महिने आले व गेले. जहाज पश्चिमेकडेच जात होते; पण ते अतिमंद गतीने. जुलै व ऑगस्ट महिन्यांमध्ये पुनः काही थोडे बर्फ

वितळून पृष्ठभागावरून प्रवाह वाहू लागले, काही ठिकाणी त्यांना एक विलक्षण प्रकार आढळून आला. तळाशी बर्फाचे जाड थर कायम असून वरचेच थर तेवढे वितळले होते; आणि बर्फावर गोड्या पाण्याचे सरोवर निर्माण झाले होते. ते इतके खोल की, त्यातून जहाजावरील नौका खुशाल तरंगत. काही दिवसांनी या सरोवराच्या तळाशी भगदाड पडून सर्व पाणी बुडाशी असलेल्या समुद्रात गळून गेले. उन्हाळ्या दिवसात टर्मिगॅन, खिलेमॉट व दुसरे काही पाणकोंबड्याच्या व पाणबगळ्याच्या जातीचे बरेचसे पांढरे शुभ्र पक्षी या भागावरून उडून जात येत असताना आढळले. निळ्या आकाशातून यांच्या पांढऱ्या शुभ्र लांबलचक रांगा दृष्टिपथापलीकडे जाताना पाहून आकाशातूनही बर्फाचे थर जात येत आहेत की काय असा त्यांना भास झाला!


ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या तारखेस ८२ वे अक्षवृत्त त्यांच्या जहाजाने गाठले; व पुनः एकवार त्यांनी तो दिवस मोठ्या आनंदाने साजरा केला. या भागात पांढऱ्या अस्वलांचे मोठमोठे थवे आढळू लागले; आणि म्हणून त्यांनी त्यांच्या मांसावरच मेजवानीचा जोर केला. येथील थंडी आमच्या नाविकांच्या अंगवळणी पडली होती म्हणून बरे; नाहीतर ती खरोखर इतक्या कडाक्याची पडू लागली होती की, एका चिमुकल्या हिमकुत्र्याने न कळत एका लोखंडी तुकड्याला चाटण्याकरिता सहज जीभ लाविली, तो ती थंडीने गारठून त्यालाच चिकटून बसली व काही केल्या सुटेना! सगळी जीभ बाहेर पडते की काय असे झाले; आणि गरीब बिचारे कुत्रे आर्तस्वराने किंचाळू लागले! शेवटी त्या लोखंडी तुकड्यात हळूहळू उष्णता उत्पन्न केल्यावर त्यापासून त्या कुत्र्याची सुटका झाली; तथापि जिभेचे दुखणे बरे होण्यास पुढे किती तरी दिवस लागले. ८३ व्या अक्षवृत्तापर्यंत जहाज आले, पण त्याची प्रगती पुढे फारशी होण्याचे चिन्ह दिसेना; आणि थंडी तर जास्त जास्तच

वाढू लागली. तेव्हा बर्फावरून लाकडी जोडयांच्या साहाय्याने पायीच प्रवास करीत ध्रुवबिंदू गाठावयाचा असे नॅन्सेनने ठरविले. 'फ्रॅम' गलबत कॅ. स्वरड्रूप याच्या हवाली करून आणि ले. जोहान्सेन् यास तेवढा बरोबर घेऊन १८९४ च्या डिसेंबरमध्ये तो मोठ्या हिमतीने निघणार होता. त्याने बरोबर बर्फावरून घसरणाऱ्या गाडया व हिमकुत्री आणि वळकट वांबूच्या केलेल्या हलक्या व चिमुकल्या 'कायाक' नावाच्या नावा घेतल्या होत्या. त्याचप्रमाणे दोघांना निदान तीन महिने पुरी पडेल अशी अन्नसामग्री घेतली होती. पण एकाएकी बर्फाचा जोर 'फ्रॅम' गलबताच्या एका बाजूने इतका वाढत गेला की, ते वर उचलले जाण्याच्या ऐवजी उलटून पडते की काय अशी चिंता उत्पन्न झाली. डॉ. नॅन्सेन्चेही धाबे दणाणले! गलबतावरचे सर्व साहित्य खाली उतरविण्यात आले त्यासरशी गलबत सावरले व नॅन्सेन्च्या जिवात जीव आला! यातच १८९५ या वर्षाचे जानेवारी व फेब्रुवारी हे दोन महिने गेले; आणि पूर्वी ठरल्याप्रमाणे डॉ. नॅन्सेन् व ले. जोहान्सेन् हे पुढील प्रवासास ता. १४ मार्च रोजी निघाले.


ग्रीनलंड बेट ओलांडून जाताना आलेला अनुभव या वेळी डॉ. नॅन्सेन् यास फारच उपयोगी पडला. पहिल्या आठवडयात त्यांचा प्रवास बराच झाला. तरी पण बर्फाचे डोंगर ओलांडून जाणे हे काम काही सोपे नव्हते. अन्न दुर्मिळ झाल्यामुळे बरोबरच्या कुत्र्यांना, त्यांच्याच भावंडांना मारून खाऊ घालावे लागले! ते स्वतः इतके अशक्त झाले की, दररोज ९ किंवा १० तास खपूनही त्यांना फारसे अंतर तोडता येईना. मधूनमधून गारांचा वर्षाव होई त्यामुळे पुढचे काहीही दिसेनासे होई. शिवाय गारांचा मार खावा लागे तो वेगळाच! एप्रिल महिना उजाडला. तेव्हा नॅन्सेनच्या लक्षात आले की, यापुढे फारसे पुढे जाणे म्हणजे उपासमार होऊन मरण्याची पाळी यावयाची. शेवटी अत्यंत जिवापाड श्रम करूनही फारसे

पुढे जाता येत नाही असे पाहून शिल्लक राहिलेल्या अन्नसामग्रीवर परत फिरावयाचे असे त्याने ठरविले. ज्या ठिकाणी त्याने हा बेत ठरविला ते ठिकाण उत्तर अक्षांश ८६°१३-६' म्हणजे ध्रुवबिंदूपासून २६० मैलांवर होते. येणेप्रमाणे जरी डॉ. नॅन्सेन् याला ध्रुवबिंदू प्रत्यक्ष गाठता आला नाही, तरी ती गोष्ट आज नाही उद्या शक्य आहे, असे त्याने सिद्ध केले; आणि उपासमार करून घेऊन मरण्यापेक्षा परत फिरण्यातच त्याने शहाणपणा दाखविला.

परत येतानाही त्या दोघांना कमी कष्ट पडले नाहीत. कधी कुत्र्याच्या मांसावर, कधी सील मासा मारून, तर कधी जवळच्या अन्नावर ते आपली भूक भागवीत. याप्रमाणे मे, जून व जुलै हे महिने गेले तरी त्यांचा प्रवास संपण्याचे चिन्ह दिसेना. केव्हा केव्हा ते निजले असताना त्यांच्या कुत्र्यांवर व स्वतः त्यांच्यावरही पांढऱ्या अस्वलाने किंवा वॉलरसाने हल्ला करावा. तथापि जीवाला कोणताही अपाय न होता ऑगस्ट ८ तारखेस ते फ्रॅन्झ जोसेफ या बेटाशेजारी आले; आणि तब्बल दोन वर्षांनंतर त्यांनी जमिनीवर एकदाचे पाय ठेविले ! 'फ्रॅम्' गलबत सोडल्यापासून तर त्यांचा ७०० मैलांचा वर्फावरून केवळ पायी प्रवास झाला होता. या प्रवासाने त्यांना अतिशय शीण आला होता. म्हणून त्यांनी या बेटावर काही दिवस विश्रांती घेण्याचे ठरविले. सुदैवाने या भागात वॉलरस, अस्वले व सील यांचे थवेच्या थवे आढळल्यामुळे अन्नाची टंचाई नव्हती किनाऱ्यावर त्यांनी थंडीच्या निवारणार्थ हाडे व कातडी यांची एक ठेंगणीच पण ऊबदार अशी झोपडी बांधली. ह्या झोपडीत त्यांनी ९ महिने काढले;, आणि ता. १९ मे १८९६ रोजी तेथून ते नॉर्वेकडे येण्यास निघाले. हा प्रदेश त्यांच्या माहितीचा होता. फ्रॅन्झ जोसेफ बेटाहून प्रथम स्पिट्झबर्गेन या बेटांना गाठण्याचे ठरवून ते त्या दिशेने निघाले. उत्तरेकडून येणारा वारा अनुकूल असल्यामुळे व समुद्राचा गोठलेला भाग सपाटच असल्या-



उत्तर ध्रुव
फ्रँझरजोसेफ लँड
नॅनसेनची झोपडी

मुळे घसरणाऱ्या गाड्यांना त्यांनी शीड लाविले आणि त्यामुळे त्यांचा प्रवास झराझर होऊ लागला. जून महिन्यात तर गोठलेला समुद्र मोकळा झाल्यामुळे त्यांनी बरोबर घेतलेल्या बांबूच्या दोन नावांचा उपयोग केला. त्या नावा एकमेकीस बांधलेल्या होत्या. मध्यंतरी एका बेटावर रात्रीचे ते निजले असता त्यांच्या नावा सुटून ओघाला लागल्या होत्या. जोहान्सेन् यास ही गोष्ट प्रथम आढळली आणि त्याने लागलीच नॅन्सेन् यास जागे केले. त्याने क्षणाचाही विलंब न लावता एकदम त्या गार गार पाण्यात उडी टाकली आणि जिवापाड मेहनत घेऊन त्या नावांना पकडले. पण तो इतका गारठला होता व इतका दमला होता की, त्याला त्या नावांवर चढतासुद्धा येईना! पण सर्व बळ एकवटून तो त्यांवर चढला. असो. नॅन्सेन् व जोहान्सेन् यांचे कष्टाचे दिवस संपले. कारण, १७ जून रोजी याच भागात असलेल्या बेटांचा शोध करण्याकरिता आलेल्या जॅक्सन् व हार्म्स्वर्थ या नाविकांची व त्यांची भेट झाली. डॉ. नॅन्सेन् व जोहान्सेन् यांना पाहून त्यांना आनंदाचे भरते आले. जणू वनवासाहून परत आलेल्या रामाची भरताशी झालेली ही भेटच होय! त्यांच्या 'विंडवर्ड' या जहाजातून ते सर्व प्रवासप्रिय व साहसी नाविक आपल्या मायभूमीस (केप व्हार्डो या ठिकाणी) सुखरूपपणे येऊन पोहोचले. तेथे त्यांचे दरबारी थाटाचे स्वागत झाले. पण डॉ. नॅन्सेन् याने पहिला प्रश्न विचारला तो आपल्या प्राणाहून प्रिय अशा, 'फ्रॅम्' गलबताबद्दल व त्यावरील जिवलग मित्रमंडळीबद्दल. आणि आश्चर्याची गोष्ट ही की, 'फ्रॅम्' गलबतही खरोखर त्याच दिवशी केप व्हार्डो येथे पूर्ण तीन वर्षांनी येऊन परत लागले होते! पण ही आनंदाची गोष्ट हॅमरफेस्ट या नॉर्वे देशाच्या अगदी उत्तरेस असलेल्या शहरी ज्या दिवशी ते आले त्या दिवशी त्यांना कळली. तेव्हा डॉ. नॅन्सेन् याचे हृदय आनंदाने भरून आले व त्या भरात त्याने जोहान्सेन् यास मिठी मारिली!

# ध्रुव-प्रदेशांचा शोध

डॉ. नॅन्सेन् याला उत्तर-ध्रुव-बिंदू जरी प्रत्यक्ष गाठता आला नाही, तरी आज नाही उद्या तो गाठणे मनुष्याच्या आटोक्यातले आहे, ही गोष्ट त्याने सिद्ध केली होती. या प्रदेशातून प्रवास करताना प्रत्यक्ष कोणत्या हालअपेष्टा सोसाव्या लागतात, व अनपेक्षित अशाही कोणत्या संकटांना तोंड देऊन त्यांतून धिमेपणाने मार्ग काढावा लागतो आणि याकरिता कोणत्या प्रकारची तयारी आगाऊ करणे अवश्य असते, इत्यादी गोष्टींचा उत्तम अनुभव त्याला स्वतःस आला व त्यासंबंधीचे सर्व प्रकारचे ज्ञान त्याने अनेक होतकरू व साहसी प्रवाशांना करून दिले.

ध्रुव-प्रदेशातील समुद्र वर्षातून सारा दोन तीन महिनेच मोकळा असतो; आणि त्या वेळीच काय ते या प्रदेशामध्ये गलबतातून जाणे शक्य असते. पण केवळ गलबतातून ध्रुवबिंदू गाठणे अशक्य म्हणून शक्य तेथपर्यंत गलबतातून जाऊन पुढे बिनचाकी गाड्यांच्या साहाय्याने जावयाचे, अशी या भागातून प्रवास करण्याची प्रथा पडली होती. तथापि याही पद्धतीने डॉ. नॅन्सेन् यास आपली महत्त्वाकांक्षा पूर्ण करून अपूर्व यश संपादन करिता आले नाही. तेव्हा इ. स. १८९६ साली नॅन्सेन् परत आल्यावर त्याच वर्षी स्वीडनमधील प्रो. **सॉलोमन ऑगस्टे आन्द्रे** यास

आकाशमार्गे ध्रुवबिंदू गाठावा अशी अभूतपूर्व कल्पना सुचली. आकाशा नौकेचे थोडेबहुत ज्ञानही या प्रोफेसरांना होते. प्रतिव्यापारी वाऱ्याच्य-सहाय्याने ध्रुवबिंदूपर्यंत आकाशनौकेने जाता येईल अशी यांना अंतर्यामी खात्री वाटत होती, म्हणून प्रत्यक्ष ती गोष्ट करून पाहण्याचेच त्यांनी ठरविले. या कामी स्वीडनच्या राजेसाहेबांनी मनापासून त्यांना द्रव्यसाहाय्य केले. कारण यात यश आल्यास स्वीडन देशाची कीर्ती जगभर पसरणार होती. इतर धनिक लोकांनीही बराच निधी जमवून तो प्रो. आन्द्रे यांना अर्पण केला.

आन्द्रे यांनी एक ' ईगल् ' ( गरुड ) नावाची प्रचंड आकाशनौका तयार करविली. स्पिट्झबर्गेन् या बेटापर्यंत गलबताने जावयाचे व तेथून आकाशमार्गे उड्डाण करावयाचे, असा त्यांनी बेत केला. त्याप्रमाणे ता. ११ जुलै १८९७ रोजी दुपारी वाऱ्याची अनुकूलता पाहून दोन अनुयायांसह आन्द्रे यांनी आकाशनौकेत मोठ्या धडाडीने स्पिट्झबर्गेन् येथे आरोहण केले. एका तासाच्या आतच आकाशनौकेने जमिनीपासून ३००० फूट उंचीपर्यंत उड्डाण केले व पुढे ती लोकांच्या दृष्टिपथापलीकडे गेली ! ज्या गतीने ही आकाशनौका ध्रुवबिंदूकडे जात होती, त्याच गतीने ती जात राहिल्यास तीन दिवसांच्या आतच आपण ध्रुव-बिंदूवर उतरू, असा त्यांचा अंदाज होता.

अज्ञात जगातील आपल्या हालचाली ज्ञात जगातील लोकांना वेळोवेळी कळाव्या, यासाठी कबुतरांच्या शेपटीला चिठी बांधून त्यांना निरोपे म्हणून पाठवावयाचे अशी आन्द्रे यांनी योजना केली होती. त्याप्रमाणे ता. १५ जुलै रोजी एक कबुतर स्पिट्झबर्गेन् बेटांच्या आसपास सीलमासे पकडण्याकरिता गेलेल्या ' आल्कन् ' नावाच्या गलबतावर येऊन उतरले. त्याच्या शेपटीस बांधलेल्या आन्द्रे यांच्या पत्रावरून ता. १३ जुलैच्या मध्याह्नापर्यंत ते सुखरूप होते आणि त्या वेळी त्यांनी

८२ वे अक्षवृत्त ओलांडले होते, असे कळले. तसेच त्यांचा प्रवास सुखाचा होत असून प्रगतीही झपाट्याने होत होती, असे दिसते. आन्द्रे यांनी यापूर्वीही दोन कबुतरे पाठविली होती; पण ती कोठे उतरली ते कोणासच समजले नाही. मात्र यानंतर एकही कबुतर आलेले कोणास आढळले नाही, किंवा आकाशनौकेतून उड्डाण करीत जाणाऱ्या या आकाशनाविकांचे काय झाले हेही कळले नाही. चंचल वायुलहरींबरोबर हिसके खात खात कोठे तरी त्यांची आकाशनौका अंतराळातून खाली हिम-खंडावर आदळली असावी आणि अखेर त्यातच त्यांचा मोक्ष झाला असावा ! पाण्यासारखा पैसा खर्चून आणि अखेर प्राणावर पाणी सोडूनही त्यांना यश लाभले नाही हा भाग वेगळा. तथापि जिवंतपणी विमानात बसून भूगोलाचा शोध लावीत असता स्वर्ग गाठणारे हे असामान्य नरवीर धन्य होत !

डॉ. नॅन्सेन्‌चे ‘ फ्रॅम् ’ गलबत सुखरूपपणे परत घेऊन येणारा त्याचा हस्तक कॅ. स्वरड्रूप हा स्वतः पुनः एकवार तेच गलबत घेऊन सन १८९८ साली उत्तर महासागर ओलांडून ध्रुवबिंदू गाठण्याच्या हेतूने निघाला पण सतत तीन वर्षे खटपट करूनही त्याला यश आले नाही. तथापि ग्रिनलंड बेटाच्या उत्तरेस जाऊन त्या बेटाच्या पश्चिमेस असलेले ‘ ग्रीन्नेल लॅंड ’ हेही एक बेट आहे, एवढी गोष्ट त्याने सिद्ध केली.

१८९९ साली इटाली राष्ट्रातील ॲब्रुझी परगण्याचा ड्यूक, **राजपुत्र लुइगी** हा आपल्या ‘ पोलर स्टार ’ ( ध्रुव तारा ) नावाच्या एका बळकट जहाजानिशी ध्रुवबिंदूवर आपल्या राष्ट्राचे निशाण फडकविण्याच्या महत्त्वाकांक्षेने निघाला. तो जसा राजबिंडा व बळकट बांध्याचा होता, तसाच शिक्षणसंपन्न व शास्त्रज्ञही होता. हिमाच्छादित आल्प्स पर्वताच्या शिखरांवर त्याने अनेक वेळा आरोहण केले होते. त्याचप्रमाणे अलास्का-मधील ‘ सेंट एलिया ’ नावाचे अत्युच्च शिखर चढणारा पहिला नरवीर

हाच राजपुत्र होय. त्याच्या अंगी हालअपेष्टा सोसण्याची व संकटांना तोंड देण्याची भरपूर धमक होती. शिवाय आपल्यापूर्वी ज्या साहसी पुरुषांनी उत्तर-ध्रुव-प्रदेशात प्रवास केला होता अशा नॅन्सन्, नॉर्डेन्स्किओल्डप्रभृती नाविकांचा अनुभव, त्यांना आलेले यशापयश, त्यांनी आखलेले मार्ग, त्यातील अडचणी इत्यादी गोष्टींची शक्य ती माहिती प्रत्यक्ष त्यांच्याकडूनच त्याने मिळविली. अशा प्रकारे सर्व प्रकारची जय्यत तयारी झाल्यावर क्रिस्टियाना बंदरातून जून महिन्यात तो निघाला; आणि थेट फ्रॅन्झ-जोसेफ लॅंड या द्वीपसमूहाजवळ आला. त्या बेटांपैकी प्रिन्स रूडोल्फ बेटावर तळ देऊन त्या सालचा हिवाळा तेथेच घालविण्याचे त्याने ठरविले.

येथील थंडीचे दिवस म्हणजे एक भली मोठी सलग अंधारी रात्रच! तीन तीन चार चार महिने सूर्यदर्शन नाही की उजेड नाही! इटाली देशातील लोकांना हा काळ म्हणजे भयाण व भेसूर भासावा यात काय नवल! तथापि आपल्या साथीदारांना उत्साही व आनंदी ठेवण्यासाठी हा राजपुत्र फार झटत असे. एकदा त्याच्या उजव्या हाताला थंडीची बाधा होऊन जखम झाल्यामुळे दोन बोटे कापावी लागली; तरी त्याने कधीही आपल्या चेहऱ्यावर दुःखाची छटासुद्धा दाखविली नाही!

१९०० च्या एप्रिल महिन्यात कॅ. कॅग्नी याजबरोबर त्याने आपल्या काही अनुयायांचा तांडा ध्रुवबिंदूच्या मोहिमेवर पाठविला. गारांचा वर्षाव व वाऱ्यांचा झोत यांना न जुमानता कॅ. कॅग्नीने आपली बिनचाकी गाडी हिमराशींवरून कधी घसरवीत, तर कधी त्यावरून चढवीत मोठ्या कष्टाने उत्तर अक्षांश ८६°, ३३′, ४९″, या ठिकाणी नेऊन उभी केली. यापुढे जाणे मात्र त्याला किंवा त्याच्या बरोबरीच्या लोकांपैकी कोणालाही जमेना. तेव्हा तेथेच आपल्या राष्ट्राचे निशाण रोवून ते परतले. डॉ. नॅन्सेन् जेथून परतला होता तेथून ध्रुवबिंदू २६० मैलांवर होता. कॅ. कॅग्नी जेथून

परतला तेथून तो बिंदू २४२ मैलांवर राहिला. म्हणजे इटाली राष्ट्राचे निशाण इ. स. १९०० साली सर्व राष्ट्रांच्या निशाणांपुढे फडकत राहिले!

यानंतर वॉल्टर वेलमन्, मिकेलसन्, लेफिंगवेल इत्यादी नाविकांनी प्रयत्न केले खरे; पण त्यांपैकी कोणासच म्हणण्यासारखे यश आले नाही.

## कॅ. रॉबर्ट एडविन पेअरी

ध्रुवबिंदूवर आपण प्रथम पाय रोवावेत यासाठी पुष्कळ प्रवाशांनी प्रयत्न केले. काहींनी आपल्या आयुष्यात एकदाच, तर काहींनी दोनदा, तीनदा, चारदासुद्धा प्रयत्न केले. तरी ते स्थिरपद अद्याप अजिंक्य राहिले होते! त्यांचे हल्ले परतविण्यात अद्याप निसर्गासच जय मिळे. तथापि अखेर निसर्गावर अतुल विजय संपादन करणारा प्रभावशाली प्रवासी निघालाच. मात्र हे अलौकिक यश मिळवावयास त्याला सतत वीस वर्षे निसर्गाशी झुंजावे लागले! त्याला अनेक वेळी स्वाऱ्या कराव्या लागल्या; आणि शेवटी तर ध्रुव-प्रदेशात जाऊन तळच देऊन बसावे लागले. हे अपूर्व यश संपादन करणारा पराक्रमी पुरुष **कॅ. रॉबर्ट एडविन पेअरी** हा होय. गझनीच्या महमुदाने भरतखंडावर सतरा स्वाऱ्या केल्या व अनेक देवळे लुटून, मूर्ती भंगून, लोकांची कत्तल करून व सुपीक प्रदेशाची राखरांगोळी करून आपल्या खजिन्यात अगणित संपत्ती साठविली अशी त्याची ख्याती आहे. 'मूर्तिभंजक' म्हणवून घेण्यात त्याला भूषण वाटे; आणि मूर्ती फोडताना किती मूर्तिपूजकांची मने भग्न होत याची त्याला पर्वा नसे! **कॅ. पेअरीने** उत्तर-ध्रुवप्रदेशात एकूण नऊ पर्यटने केली. या पर्यटनात त्याने अगणित हिमखंडांचा चुराडाही केला; असेल, व 'हिमखंड-भंजक' म्हणवून घेण्यात त्यालाही भूषण वाटले असेल पण त्यामुळे कोणत्याही लोकांची मने मात्र दुखविली गेली नाहीत.

निसर्गावर जय मिळविणे व दीनदुबळ्यांवर क्रौर्य गाजविणे यात खरोखर दोन ध्रुवांमधील अंतराइतका फरक आहे. असो.

**रॉबर्ट एडविन् पेअरी** हा अमेरिकेतील संयुक्त संस्थानांच्या आरमारात एक इंजिनियर म्हणून काम करीत होता. एके दिवशी वॉशिंग्टन् येथील एका जुनी पुस्तके विकणाऱ्याच्या दुकानी उत्तर-ध्रुव-प्रदेशाचा शोध लावणाऱ्या वीरांच्या प्रवासवर्णनाचे एक पुस्तक सहज त्याच्या हाती लागले. झाले, या उत्साही व साहसी तरुणाच्या मनाने ती रोमांचकारी वर्णने वाचून उचल खाल्ली; आणि ध्रुव-बिंदूचा शोध लावण्याचा त्याने निश्चय केला ! निश्चय तडीला नेण्यासाठी अंगी लागणारे गुण, म्हणजे करारी स्वभाव, काटक शरीरयष्टी, खंबीर मन, प्राणांतिक हालअपेष्टा सोसण्याची तयारी आणि वाढता उत्साह हे सर्व या तरुणाच्या ठिकाणी वसत होते.

१८८६ साली बिनचाकी गाडीतून ग्रीनलंडच्या पठारावरून तो प्रथम जाऊन आला; व या पहिल्या प्रवासातच तेथील भयंकर वादळे, अखंड हिमवर्षाव, अत्यंत कडक थंडी, आणि गोठलेल्या भूप्रदेशावरून व हिमराशींवरून चढउतार करताना होणारे हाल यांची त्याला पूर्ण ओळख पटली. १८९१ साली ग्रीनलंडचा उत्तर किनारा शोधून काढण्याचे त्याने ठरविले; आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे या खेपेस पतीबरोबर हालअपेष्टा भोगण्यास त्याची पत्नीही त्याजबरोबर गेली ! रामाबरोबर वनवास भोगण्यास जशी सीता निघाली, तशीच ही साध्वी निर्जन व भयाण अशा हिम-प्रदेशात आपल्या पतीला आपल्या सहवासाने आनंद देण्यास गेली. ईव्हन् अॅस्टूप् नावाचा एक साहसप्रिय सोबतीही त्यांच्याबरोबर गेला. रामाबरोबर जसा लक्ष्मण गेला तसा.

ग्रीनलंडच्या पश्चिम किनाऱ्याने वाट काढीत ‘काइट्’ नावाच्या जहाजातून जात असता एक हिमखंड जहाजाच्या सुकाणूवर एकदम

आदळले. त्यासरशी सुकाणूचे चक्र जे निसटले ते गरगर फिरत वेगाने जाऊ लागले. या चक्रात पेअरीचा एक पाय अडकला गेल्यामुळे त्याच्या घोट्याचे हाड मोडले! पण या आपत्तीस न भिता पेअरीने ग्रीनलंडच्या वायव्यभागी असलेल्या 'व्हेल साउंड' जवळचा किनारा गाठला; आणि त्या ठिकाणी एक झोपडी बांधून त्यात ते जोडपे तेथील थंडीवाऱ्यास भीक न घालता मोठ्या आनंदाने राहू लागले. याच ठिकाणी पेअरीने आपला मुख्य तळ दिला.

पेअरीच्या पत्नीला पाहण्याकरिता म्हणून दूरदूरचे एस्किमो लोक बर्फाच्या राशी ओलांडून येत व मोठ्या कौतुकाने तिचे दर्शन घेत. मिसेस पेअरीला मात्र या एस्किमो लोकांमधील पुरुष कोण व स्त्रिया कोण हे काही दिवस ओळखता आले नाही. कारण, त्या सर्वांचाच पोषाख सील माशांच्या कातड्यांचा केलेला असून तो पायापासून डोक्यापर्यंत सारखा असतो. शिवाय स्त्रियांची उंची व पुरुषांची उंची जवळजवळ सारखी असून पुरुषांच्या ओठावरही दुरून ओळखण्याइतके केस नसतात.


१८९१ चा हिवाळा संपल्यावर ग्रीनलंडचे बर्फाच्छदित प्रचंड पठार ओलांडून जाण्याचे पेअरीने ठरविले. तेथील एस्किमो लोकांनासुद्धा हे त्याचे कृत्य मोठ्या धाडसाचे वाटले. कारण, तो टापू म्हणजे 'भुताखेतांचा प्रदेश' अशी त्यांची समजूत होती—इतका तो भयाण व भेसूर आहे! शिवाय वाऱ्याचा अखंड मारा आणि गारांचा मधूनमधून वर्षाव यामुळेही तो प्रांत जास्त भीषण भासतो. पण यांपैकी कोणत्याच गोष्टीची क्षिती न बाळगता पेअरी व ॲस्टूप् यांनी काही निवडक व धीट एस्किमो लोकांसह तो निर्जन प्रदेश ओलांडला. या कामी त्यांना पुरे दोन महिने लागले. येथील नव्या भूभागास व जलभागास त्यांनी अनुक्रमे 'पेअरी लँड' आणि 'इन्डिपेंडन्स बे' व 'पेअरी चॅनल' अशी नावे दिली. पेअरी

लँडच्या एका कड्यावरून पेअरीने सभोवार पाहिले तो सर्वत्र उत्तर-महासागर दूरवर पसरलेला त्याला आढळून आला. ग्रीनलंडही एक बर्फाच्छादित बेट आहे, ही गोष्ट त्याने सिद्ध केली. या कामगिरीबद्दल पेअरीला 'रॉयल जिऑग्रफिकल् सोसायटी' व 'अमेरिकन् जिऑग्रफिकल् सोसायटी' या मंडळांकडून दोन बहुमानाची पदके मिळाली.

पेअरीबरोबर गेलेल्या एस्किमो लोकांना पेअरीच्या धाडसाचा मोठा अचंबा वाटला, आणि त्यांच्या मनात त्याच्याविषयी एक प्रकारचा विशिष्ट आदर उत्पन्न झाला. श्रीरामचंद्रांनी समुद्रावर सेतू बांधल्यावर वानरांना जसा अचंबा वाटला असेल व श्रीरामचंद्रांबद्दल त्यांच्या मनात जसा आदर उत्पन्न झाला असेल, तशातला हा प्रकार होय. म्हणून यापुढे कोणताही एस्किमो पेअरीबरोबर कोठेही जाण्यास केव्हाही निर्भयपणे तयार होई. असो. या भागातील ही पहिली सफर १८९२ च्या जुलै महिन्यात पुरी करून ही सर्व मंडळी परत स्वदेशी गेली. तथापि ग्रीनलंड-च्या पलीकडे पसरलेल्या उत्तर-महासागराच्या मध्यभागी असलेला ध्रुव-बिंदू कसा गाठावयाचा याचाच ध्यास त्यास लागला होता; आणि तो गाठणे हेच त्याने आपल्या आयुष्याचे इतिकर्तव्य ठरविले होते.

आपल्या या ध्येयाला अनुसरून पेअरीने एका वर्षाच्या आतच दुसरी सफर हाती घेतली व १८९३ साली तो परत उत्तरेकडील हिमप्रदेशात आला. याही खेपेस त्याची धीट पत्नी त्याजबरोबर होती; आणि १८९३ च्या अखेरीस त्या जोडप्याला या हिमप्रांती एक कन्यारत्न झाले. हे त्यांचे पहिलेच अपत्य होय. एस्किमो लोकांना तर ही बातमी ऐकून अत्यानंद झाला; इतका की, शेकडो मैलांचा प्रवास करून त्या लोकांची अनेक कुटुंबे या मुलीला पाहण्याकरिता येत व तिचे कौतुक करून परत जात! १८९४ व १८९५ ही दोन्ही वर्षे पेअरीने याच भागात तळ देऊन काढली; पण म्हणण्यासारखी प्रगती झाली नाही. उलट सर्वांनाच या अखंड-हिम-प्रांती


६५४६० ७६५ भू. प्र. १९६३/६९



अतिशय कष्टमय दिवस कंठावे लागले. तेव्हा पेअरी काही दिवसांकरिता परत स्वदेशी गेला.

पण पेअरीस स्वस्थ कसचे बसवणार ? १८९६ व १८९७ ही दोन्ही वर्षे पुनः त्याने सफरीतच घालविली. या सफरीत त्याला सबाइन् भूशिराजवळील एका बेटावर ९० टन वजनाची एक उल्केची शिळा सापडली. ती त्याने आपल्या घरी नेली. जगात ही उल्केची शिळा त्या वेळी तरी सगळ्यात मोठी होती, असे सांगतात. १८९८ साली पेअरीने 'पेअरी आर्क्टिक् क्लब' नावाची संस्था स्थापन केली; व तेव्हापासून १९०६ पर्यंत त्याची उत्तर-हिमप्रदेशात एकसारखी जा-ये सुरू होती. १९०२ साली पेअरीने हेक्ला भूशिराहून ध्रुवबिंदू गाठण्याचा प्रयत्न केला;

पण अक्षांश ८४°, १७′ या पलीकडे तो जाऊ शकला नाही; १९०६ साली मात्र अक्षांश ८७°, ६′ पर्यंत त्याने मजल मारिली. तेथून ध्रुवबिंदू सुमारे १७५ मैल दूर होता. पण तो अद्याप दूरच होता! तो स्थिरबिंदू



थेट आपल्या पायाखाली आणण्याची जवळजवळ वीस एक वर्षे पेअरीची ही सर्व खटपट व धडपड चालली होती.

परंतु असाही एक दिवस शेवटी उजाडलाच! १९०९ सालातील एप्रिल महिन्याची ६ वी तारीख, हा तो दिवस होय. या दिवशी आपल्या राष्ट्राचे—पट्टे व तारका यांनी नटलेले—निशाण ध्रुवबिंदूवर रोवून त्या फडफडणाऱ्या निशाणाखाली पेअरी मोठ्या विजयी मुद्रेने व आनंदित अंतःकरणाने उभा राहिला. त्याचा आनंद खरोखरच गगनात मावेना! सतत चारशे वर्षे अनेक असामान्य साहसी प्रवाशांचे ज्या एका गोष्टी-करिता प्रयत्न चालले होते, ज्या गोष्टीकरिता तो स्वतः जवळजवळ तेवीस वर्षे एकसारखा धडपड करीत होता, ती गोष्ट सिद्ध झाल्यावर त्या वीराच्या अंतःकरणात आनंदाच्या ऊर्मी का उसळणार नाहीत? विजयश्रीने अखेर पेअरीच्या गळ्यात माळ घातली खरी; पण त्याचे श्रेय, त्याचे यश हिरावून घेणारा एक प्रतिस्पर्धी मध्येच उत्पन्न झाला! ती गोष्ट अशी —

उत्तर-ध्रुव-बिंदूवर आपल्या राष्ट्राचे निशाण फडकविण्याचे सुयश संपादन करून पेअरी पाच महिन्यांनी परत आपल्या जन्मभूमीस आला, तेव्हा या यशाची वार्ता न्यू फाउंडलंडहून सर्व जगास तारेने कळविण्यात आली. सर्व जग आपले मोठ्या उल्हासाने अभिनंदन करील, अशी पेअरीची खात्री होती. पण डॉ. फ्रेड्रिक कुक नावाच्या गृहस्थाने "बरोबर एका वर्षापूर्वी म्हणजे ता. ६ एप्रिल १९०८ या दिवशी ध्रुवबिंदूवर निशाण रोवले आहे", अशा प्रकारची तार पेअरीच्या यशाची वार्ता सर्व जगाला जाहीर होण्यापूर्वीच सुमारे एक आठवडा जगजाहीर करण्यात आली होती! जगालाही मोठे कोडे पडले. कारण, हा अभूतपूर्व व असामान्य मान कोणाचा हे ठरवायचे कसे? तथापि हे अपूर्व यश एकट्या पेअरीचे होय, असे लवकरच सिद्ध करण्यात आले, ते असे.

हा कुक् कोण? याने यापूर्वी कधीही प्रयत्न केलेले जगाला माहीत नव्हते. तर मग एकदम तो जो निघाला तो थेट आपला ध्रुव-बिंदूवर जाऊन उभा राहिला की काय? हा एखादा योगीबिगी तर नव्हे ना? इतके जर हे सुलभ होते तर सतत चार शतके लोकांनी उगीच धडपड केली म्हणावयाची! आणि पेअरीनेही उगाच अव्याहत तेवीस वर्षे जिवापाड श्रम घेतले!!

पेअरीला पराकाष्ठेचा संताप आला. "आपले यश हरण करणारा हा एक तोतया असावा; त्याने ध्रुव-बिंदू पाहिला नाही; इतकेच नव्हे, तर ध्रुव-बिंदूच्या आसपासही तो कधी गेला नसावा," असे त्याने जाहीर केले. परंतु पेअरीच्या या म्हणण्यावर तरी लोकांनी काय म्हणून विश्वास ठेवावा? किंवा पेअरीने तरी ध्रुव-बिंदू गाठला होता हे कशावरून?

पेअरीने आपल्याजवळचा सर्व पुरावा सादर केला. शिवाय वीस-बावीस वर्षे त्याने केलेली धडपड सर्व जगाला माहीत होती. कुक् मात्र कोणताच पुरावा पुढे आणीना, किंवा आणील असे लक्षणही दिसेना. एवढेच नव्हे, तर जसा तो एकाएकी प्रगट झाला होता तसाच तो एकदम गुप्तही झाला! तो तर पुढे येईनाच, पण त्याची कड घेऊन त्याची बाजू सिद्ध करण्यासही कोणी धजेना. तेव्हा कुक्चे हे सर्व थोतांड असावे असे साहजिकच सिद्ध झाले; आणि पेअरीचा मार्ग आपोआपच सुकर झाला. जगाने पेअरीचा पुरावा मान्य केला व हे अपूर्व यश सर्वस्वी पेअरीचेच होय, हेही पुनः जाहीर करण्यात आले; आणि अखेर खऱ्या वीराचे जगाने मोठ्या अंतःकरणपूर्वक अभिनंदन केले!

ज्या अखेरच्या पर्यटनात पेअरीला हे सुयश संपादन करता आले त्या पर्यटनाची माहिती येथे थोडक्यात देणे अवश्य आहे. पेअरीची या भागातील ही नववी सफर होय. वीस वर्षांच्या अनुभवाने, या भागात प्रवास करताना कोणत्या अडचणी येतात, कोणती अनपेक्षित संकटे

अचानकपणे उद्भवतात, त्याचप्रमाणे अखंड बर्फ, सतत वाहणारे गारा गार वारे, हिमकणांचा होणारा प्रचंड वर्षाव आणि कल्पनातीत थंडी या सर्वांना तोंड कसे द्यावयाचे आणि उपासमार कशी टाळावयाची, या सर्व गोष्टींची पेअरीला उत्तम माहिती झाली होती. म्हणून या खेपेची तयारी शक्य तितकी पूर्ण अशी त्याने केली. पेअरीचे वयही आता होत आले होते. वीस वर्षांच्या दगदगीने तर त्याची प्रकृती पूर्वीसारखी दणकट राहिली नव्हती. अर्थात यश मिळाल्यास ते याच सफरीत, नाही तर यापुढे ती गोष्ट अशक्य, असेही पेअरीला वाटत होते. म्हणून त्याने मोठी जय्यत तयारी केली.


नेहमीच्याच मार्गाने आपले ' रूझवेल्ट ' नावाचे गलबत बरोबर घेऊन पेअरी सर्व तयारीनिशी शेरिडन् भूशिरापर्यंत आला. तेथे १९०८ सालचा हिवाळा त्याने घालविला. ता. १५ फेब्रुवारी १९०९ या दिवशी ' रूझवेल्ट ' गलबत तेथेच सोडून पुढच्या प्रवासास पेअरी निघाला. मार्च महिन्याच्या १९ तारखेस त्याने कोलंबिया भूशिर सोडले व तेथून थेट उत्तरेचा मार्ग धरला. त्याच्या बरोबर त्याचे ७ अनुयायी, १७ एस्किमो लोक आणि १३३ हिम-कुत्री होती. तसेच त्याने १९ बिनचाकी गाड्याही घेतल्या होत्या.

पेअरीने या लोकांचे टप्पे टप्पे करून ठेविले होते. म्हणजे अमुक एक अंतरावर त्यांनी पुढच्या प्रवासास जाणाऱ्या शेलक्या लोकांकरिता सामान नेऊन ठेवावयाचे व मग तेथून 'रूझवेल्ट' गलबताकडे परतावयाचे, अशी ती योजना होती. अखेरचा टप्पा ८८ व्या अक्षवृत्तावर होता. तेथून कॅब्रार्टलेट हा कॅ. पेअरीचा निरोप घेऊन परतला आणि पेअरी मोठ्या धिमेपणाने पुढच्या प्रवासास लागला.

पेअरीबरोबर ४ निवडक एस्किमो व हेन्सन् नावाचा त्याचा फार दिवसांचा अत्यंत विश्वासू सिद्दी नोकर एवढेच लोक होते. या सर्वांना

चाळीस दिवस पुरेल एवढी अन्नसामग्री त्याने बरोबर घेतली होती. ते मोठ्या उमेदीने प्रवासास लागले. पेअरीच्या पूर्वज्ञानामुळे त्याची प्रगती भराभर होऊ लागली. एप्रिलच्या ४ थ्या तारखेस ८९ वे अक्षवृत्त ओलांडून एप्रिलच्या ६ व्या तारखेस त्यांनी आपले पाऊल एकदाचे ध्रुव-बिंदूवर मोठ्या उल्लसित अंतःकरणाने ठेविले! पेअरीस तर जणू स्वर्ग प्राप्त व्हावा इतका आनंद झाला! उत्तरहिमप्रदेशाच्या अक्षरशः अगदी मध्यभागी ते उभे होते. दीड दिवस त्यांनी येथे घालविला. उत्तर, पूर्व आणि पश्चिम या दिशा पार नाहीशा झालेल्या त्याने पाहिल्या. ध्रुवबिंदू सोडून कोणीकडेही दूर गेल्यास दक्षिण दिशा लागते, असे त्याच्या अनुभवास आले. थेट डोक्यावर ध्रुवाचा तारा तळपताना पाहून त्याला समाधान वाटले, आणि सूर्याला केव्हाही क्षितिजाच्या आसपास व ध्रुवबिंदूभोवती प्रदक्षिणा करताना पाहून आश्चर्य वाटले.

पेअरीने काही भागांचे फोटो घेऊन, तेथपर्यंत गेल्याबद्दलच्या काही खुणा तेथे ठेविल्या. आणि मग मोठ्या संतुष्ट चित्ताने ते सर्व परतले. ध्रुवबिंदूपासून कोलंबिया भुशिर ४७५ मैल आहे. तेथे जाण्यास त्यांना ३७ दिवस लागले तर परत येण्यास सारे १६ दिवस पुरले. ही सफर फारच सुखाची झाली, कारण पेअरीने आरंभापासून जी प्रवासाची रूपरेषा आखली होती त्याप्रमाणे सर्व गोष्टी सुरळीत घडत. शिवाय त्याने जय्यत तयारी केली होती, हीही गोष्ट विसरून चालणार नाही. मात्र मौज ही की, त्याच्याबरोबर गेलेल्या एका एस्किमोने हे अपूर्व यश पेअरीला दिले नाही; तो म्हणतो, “या भीषण प्रांताचा स्वामी वेताळ हा या दोन तीन महिन्यांच्या अवधीत कुंभकर्णाप्रमाणे गाढ निजला तरी होता, किंवा तो आपल्या प्रियकरणीबरोबर भांडण्यात तरी गुंतला होता; त्याशिवाय पेअरीचा प्रवास इतका सुलभ, सुखकर व लवकर झालाच नसता!” काही का असेना, पेअरीच्या दीर्घोद्योगी साहसास अखेर सुयश लाभले, ही गोष्ट केव्हाही अभिनंदनीयच होय.


हिमतटांची मर्यादा दाखवणारी रेषा
ॲटलँटिक महासागर
एंडेरबी लँड
हिंदी महासागर
केंपलँड
हिमतट
कैसर विल्युम २ लँड
अज्ञात भाग
नॉक्स लँड
बॅलेनी लँड
सॅब्रिना लँड
कोटस लँड
दक्षिण ध्रुव सन्निध प्रदेश
दक्षिण ध्रुव
स्कॉट १७ जाने. १९१२
ॲमुन्डसेन डिसें. १४-१९११
ॲडेली लँड
शॅकल्टन १९०९
किंग हाकोन ७
लोहचुंबक ध्रुवबिंदु
साऊथ शेटलँड बेटे ब्रि
ग्रॅहम लँड
चारकॉट लँड
मैदान
साऊथ व्हिक्टोरिया लँड
अलेक्झांडर १ लँड
किंग एडवर्ड लँड
अज्ञात भाग
दक्षिण अमेरिका
मॅक्वारी बेटे ब्रि
ऑक्लन ब्रि.
स्टिवार्ड बे
दक्षिण पॅसिफिक महासागर
हिमतटांची मर्यादा
ॲन्टिपोडस ब्रि
बाऊंटी बे.
लिटलटन
चॅथम बे ब्रि.
स्कॉट याने आक्रमिलेला मार्ग
अमुंडसेन याने आक्रमिलेला मार्ग
शॅकल्टन याने आक्रमिलेला मार्ग

# दक्षिण-ध्रुव-प्रदेश

फर्डिनंड मॅगेलन याने पहिली पृथ्वीप्रदक्षिणा करून पृथ्वी वाटोळी आहे ही गोष्ट अनुभवसिद्ध केली. नंतर पृथ्वीला स्वतःचा प्रकाश नाही, परंतु ती स्वतःभोवती फिरते व सूर्याभोवतीही फिरते, आणि त्यामुळेच दिवस, रात्र, ऋतु व वर्ष ही स्थित्यंतरे घडतात, या शास्त्रीय गोष्टी निःशंकपणे मान्य करण्यात आल्या. त्याचप्रमाणे विषुववृत्त, क्रांतिवृत्त, कर्कवृत्त, मकरवृत्त, ध्रुववृत्ते आणि ध्रुवबिंदू इत्यादी पृथ्वीसंबंधी खगोलविषयक संज्ञांना–त्या सर्व पूर्वी अनुमानाने रूढ झाल्या होत्या तरी–साहसप्रिय शोधकांच्या प्रयत्नांमुळे प्रत्यक्ष ज्ञानाचा पाठिंबा मिळाला. अनेक नाविकांकडून जशा पृथ्वीप्रदक्षिणा सुरू झाल्या तसे तसे नवे नवे अज्ञात प्रदेश व नवे नवे जलमार्ग आक्रमण्यात येऊ लागले. उत्तर अमेरिकेचा उत्तर किनारा आणि युरेशियाचाही उत्तर किनारा यांच्या सीमा ठरून व सर्व उत्तर-ध्रुव-प्रदेशाचा शोध लागून थेट उत्तर-ध्रुवबिंदूवर मनुष्याने आपले पाऊलही उमटविले. हे यश सुप्रसिद्ध कॅ. पेअरी याने कसे संपादन केले हे आपण मागे वाचले आहेच.

विषववृत्तापासून उत्तरेकडे ९० व्या अक्षांशावर जसा उत्तर-ध्रुव-बिंदू स्थिर आहे. तसाच दक्षिणेकडे ९० व्या अक्षांशावर दक्षिण-ध्रुव-बिंदू

स्थिर आहे. उत्तर-ध्रुव-प्रदेश व उत्तर-ध्रुव-बिंदू यांच्या शोधार्थ जवळ-जवळ चारपाच शतके खर्ची झाली आणि शेकडो शोधकांचे प्राणांतिक कष्ट कारणीभूत झाले. त्याचप्रमाणे मधूनमधून साहसी आणि शास्त्रीय शोधकांची दृष्टी दक्षिण-ध्रुव-प्रदेश व दक्षिण-ध्रुव-बिंदू याकडेही वळत असे. प्रस्तुत प्रकरणात यासंबंधीचीच माहिती देण्याचे योजिले आहे.

## पूर्ववृत्तान्त


दक्षिण गोलार्धातील दक्षिण अमेरिका, ऑस्ट्रेलिया, न्यू झीलंड, इत्यादी भूप्रदेशांचा शोध लागून त्यांच्या मर्यादा निश्चित होऊ लागल्या होत्या, व दक्षिण ॲटलँटिक, दक्षिण पॅसिफिक व दक्षिण हिंदी महासागर यांच्या दक्षिण भागी अंटार्क्टिका नावाचे एक प्रचंड भूखंड पसरलेले आहे, असा आकर्षक समज शोधकांच्या मनाने करून घेतला होता. हे खंड म्हणजे ‘ तिसरे विस्तृत जगच ’ होय, असे पुष्कळजणांस वाटत होते. युरेशिया व आफ्रिका म्हणजे ‘ जुने जग ’, दोन्ही अमेरिका म्हणजे ‘ नवे जग, ’ आणि त्याचप्रमाणे दक्षिणेकडे हे ‘ तिसरे जग ’ असावे, अशी दृढ समजूत त्या वेळी झाली होती [ ओशियानिया म्हणजे केवळ एक लहान-मोठ्या बेटांचा समूह येवढेच ते मानीत आणि तीच गोष्ट सध्याही सर्वमान्य आहे ]. मात्र विषुववृत्तापासून जो जो उत्तरेकडे दूर दूर जावे तो तो थंडीचे प्रमाण जसे वाढत जाते व हिमाच्छादित प्रदेश लागतो तसेच विषुववृत्तापासून जो जो दक्षिणेकडे दूर दूर जावे तो तो थंडीचे प्रमाण वाढत जाऊन या तिसऱ्या जगाच्या आसपास व मध्यभागी हिममय प्रदेश असावेत, अशी या शोधकांची अटकळ होती. हे एक त्या वेळी शास्त्रीय अनुमान होते व पुढे प्रत्यक्ष अनुभवाने ते थंडीच्या प्रमाणापुरते खरेही ठरले. फरक इतकाच की, उत्तर गोलार्धात जेव्हा उन्हाळा असतो तेव्हा दक्षिण गोलार्धात हिवाळा असतो; आणि उत्तर

गोलार्धात जेव्हा हिवाळा असतो तेव्हा दक्षिण गोलार्धात उन्हाळा असतो; आणि हा उलटासुलटा क्रम होण्याचे खरे कारण म्हणजे पृथ्वीचा आस २३॥. अंशांनी तिच्या कक्षेकडे कलला आहे हे होय.

दक्षिण अटलँटिक, दक्षिण पॅसिफिक व क्वचित हिंदी महासागर यांवरून प्रवास करीत असता कित्येक नाविकांच्या नावा वादळात सापडून पुढे त्या दक्षिण गोलार्धातील प्रतिव्यापारी वाऱ्यांच्या कक्षेत येत आणि त्यांनी त्या तशाच दक्षिणेकडे लोटल्या गेल्यामुळे दक्षिण-ध्रुव-प्रदेशातील काही काही बेटे त्यांच्या दृष्टिपथात येत. कधीकधी काही साहसी नाविक, देवमासे, जलसिंह (सील मासे), जलव्याघ्र (वॉलरस) यांच्या शिकारीच्या नादाने दक्षिण ६०, क्वचित ६६ अक्षांशांपलीकडेही जात. पण त्यापुढे त्यांना हिमखंडाचे प्रचंड तट आगेमागे लागत, म्हणूनच या हिमतटांपलीकडे तिसरे एक भले मोठे जग असावे, अशी त्यांची समजूत झाली होती.

या खंडाचा शोध लावण्याचे पद्धतशीर कार्य प्रथम कॅ. कुक् या इंग्लिश नाविकाने केले. त्याने तीन वेळा पृथ्वीप्रदक्षिणा केली ही गोष्ट महशूर आहेच. त्याच्या तिसऱ्या पर्यटनाच्या वेळी, म्हणजे इ. स. १७७४ साली, 'निश्चय' ('रेझोल्यूशन्') व 'साहस' ('ॲडव्हेंचर') या जहाजांनिशी त्याने दक्षिण ७१ व्या अक्षांशापलीकडे प्रवेश केला. पण यापलीकडे एखादे संपन्न भूखंड असेल अशी जी एक भ्रामक कल्पना काही काही नाविकांनी प्रसृत केली होती, ती साफ चुकीची असून ६६॥. व्या अक्षवृत्ताच्या अलीकडे भूखंड नाहीच, असे त्याने जाहीर केले. ६६॥ व्या अक्षवृत्तापलीकडे एखादे भूखंड असेल; पण ते केवळ हिममय, भयाण, ओसाड व निर्जन असेच असणार, असा त्याचा अभिप्राय पडला.

कॅ. कुक्नंतर ४५ वर्षांनी १८१९ साली रशियाचा बादशाह पहिला अलेक्झांडर याने फॉं बेलिंघौसेन (Bellinghausen) नावाच्या नाविकाला अँटार्क्टिका खंडाचा शोध करण्यास पाठविले. याने अँटार्क्टिक वृत्ताच्या पलीकडे असलेल्या दोन बेटांचा शोध लाविला; आणि एकास 'पीटर दि फर्स्ट' बेट व दुसऱ्यास 'अलेक्झांडर दि फर्स्ट' बेट अशी नावे दिली. बेलिंघौसेन याने कुक्च्याच मतास पुष्टी दिली. १८२३ साली जेम्स बेडेल याने ७४ अक्षांशापलीकडे असलेल्या समुद्रात प्रवेश केला. या समुद्रास 'वेडेलचा समुद्र' म्हणतात. त्यानंतर जॉन बिस्को, जॉन बॅलनी, दूमॉं दूर्व्हिले (Dumont d'urville), कॉमॉडोअर विल्कीज, सर जेम्स रॉस इत्यादी नाविकांनी अनेक बेटांचा, हिमतटांचा व भूशिरांचा शोध लाविला. सर जेम्स रॉस याने उत्तर-लोहचुंबक ध्रुवबिंदूचा (North Magnetic pole) शोध लाविला होता; आणि त्याच्या मनातून दक्षिण-लोहचुंबक ध्रुवबिंदूचा (South Magnetic Pole) शोध लावावयाचा होता. म्हणून १८३९ साली इंग्लंडच्या




नाविकदलाच्या अधिपतीने त्याला या कामगिरीवर पाठविले. त्याच्याबरोबर 'टेरर' व इरेबस' नावाची दोन चिमुकली जहाजे होती. या

जहाजांनिशी हिमखंडांतून व हिमतटांमधून वाट काढीत काढीत तो अडेअर भूशिरापर्यंत येऊन पोचला. तेथे त्याला सुमारे १०,००० फूट उंचीचे, जणू नभोमंडळास छेदून जाणारे, हिमाने तळापासून माथ्यापर्यंत आच्छादिलेले शिखर दृष्टीस पडले. या शिखरास 'माउंट सबाईन' असे एका तत्कालीन प्रख्यात शास्त्रज्ञाचे नाव देण्यात आले. याच भागातील समुद्रास 'रॉसचा समुद्र' म्हणतात. याशिवाय या समुद्राच्या किनाऱ्यालगत त्याला एक सुमारे ५०० मैल लांबीची पर्वत-श्रेणी आढळली. या श्रेणीच्या दक्षिण भागी त्याला सुमारे १२,००० फूट उंचीची दोन ज्वालामुखी शिखरे दिसली. या शिखरांच्या बाहेरील बाजू हिमाने मढविल्या असून आतून ज्वालांचे लोट बाहेर येत असतात. असे ते अप्रतिम दृश्य पाहून सर जेम्स रॉस याला व त्याच्या बरोबरच्या इतर नाविकांना मोठे आश्चर्य वाटले आणि आनंदही झाला. या शिखरांना त्याने आपल्या चिमुकल्या जहाजांचीच नावे दिली. नंतर पूर्वेकडील काही हिमतटांच्या भागांचा शोध लावून तो परत आला.

यापुढील काळात पुष्कळ शोधकांचे लक्ष उत्तर गोलार्धातील ध्रुवप्रदेशाने व ध्रुवबिंदूने वेधून घेतले असल्यामुळे दक्षिण गोलार्धातील या प्रदेशाकडे त्यांचे लक्ष कमी कमी झाले. इतके की, जवळ जवळ ५० वर्षे या भागाकडे कोणीही गेले नाही असे म्हटले तरी चालेल. फक्त १८७४ साली 'चॅलेंजर' नावाची पहिली आगबोट घेऊन कॅ. नेअर्स हा गेला होता. त्याने नवीन प्रदेशाचा असा कोणताही शोध लाविला नाही; मात्र कोणता समुद्र किती खोल आहे, किंवा हवामान कोठे केव्हा, किती बदलत असते, रात्री आकाशात कोणते तारकापुंज कोणत्या दिवसात कोठे दिसतात, कोणते पशुपक्षी कोणत्या भागात, कोणत्या ऋतूत केव्हा आढळतात, कोणत्या वनस्पती कोठे उगवतात इत्यादी सर्व प्रकारची, निरीक्षण करून मिळणारी शास्त्रीय माहिती त्याने मिळवली.

१८९८ साली या भागाचा जास्त शोध लावण्याकरिता बेल्जियमच्या लोकांनी एक 'बेल्जिका' नावाचे २५० टन वजनाचे चिमुकले जहाज कॅ. एडिसन् गेर्लशे ( Gerlache ) याच्या नेतृत्वाखाली पाठविले. आतापर्यंत जे नाविक या प्रदेशाकडे जात ते तिकडील उन्हाळा साधून होय. म्हणजे,ऑक्टोबर ते एप्रिल अखेर ते आपली सफर संपवून परत येत. हेही जहाज त्याच अंदाजाने तिकडे गेले होते. फेब्रुवारी महिन्याच्या मध्याच्या सुमारास या जहाजाने दक्षिण-ध्रुव-वृत्त ओलांडले. पण पुढे लवकर परत येण्याच्या ऐवजी शक्य तितक्या दक्षिणेस जाऊन पाहावयाचे असे कॅ. गेर्लशे याने ठरविले. त्यामुळे असे झाले की, मेच्या १५ तारखेस तो ज्या प्रदेशात होता त्या प्रदेशात जो एकदा सूर्यास्त झाला तो पुढे दहा आठवडे त्यांना सूर्यदर्शन झाले नाही ! त्यांचे जहाज बर्फात रुतून बसले, आणि नित्य पडणाऱ्या हिमकणांचा वर्षाव, अंगाला झोंबणारे गार गार वारे, सभोवती पसरलेले घनदाट धुके आणि सर्वांस व्यापणारा भयाण अंधार यामुळे त्यांचे अत्यंत हाल होऊ लागले. मधून मधून जहाजावर बर्फाचे ढीग आदळत, तेव्हा तर त्यांचे धाबे दणाणे ! एखादे वेळी वादळामुळे आणि बर्फाच्या आघातामुळे जो घनघोर आवाज नभोमंडळात घुमे त्यामुळे एकमेकांचे बोलणेसुद्धा एकमेकांना ऐकू जात नसे.


जुलै महिन्यापासून त्यांना पुनः रोज सूर्यदर्शन घडू लागले खरे, पण प्रथम प्रथम तर सूर्यप्रकाश काही तासच मिळे. क्रमाक्रमाने प्रकाशाचे तास वाढत जाऊन अंधाराचे तास कमी होऊ लागले. तरी पण मार्चचा (१८९९) निम्मा महिना संपेपर्यंत त्यांच्या रुतलेल्या जहाजाला हालचाल करता आली नाही. याच जहाजावर पुढे जगात आपल्या कृत्यांनी सुप्रसिद्धी व कुप्रसिद्धी मिळविणाऱ्या दोन व्यक्ती होत्या, ही एक नवलाचीच गोष्ट होय. रोल्ड अमुंडसेन आणि फ्रेडरिक अ‍ॅलब कुक् या त्या दोन व्यक्ती होत. अमुंडसेन यानेच पहिल्या प्रथम दक्षिण-ध्रुवबिंदू गाठून आपले नाव

जगात अमर करून ठेविले आहे. कुक् हा वाचकांच्या चांगल्या परिचयाचा आहे. 'आपण कॅ. पेअरीच्या आधी एक वर्ष उत्तर-ध्रुव-बिंदू गाठला होता,' असे जाहीर करणारा कुक् तो हाच; आणि त्यामुळेच त्याचा दुर्लौकिक झाला. केवढे या दोन व्यक्तींमधील अंतर! दोन विरुद्ध दिशेचे ध्रुवबिंदू गाठणारे पेअरी व अमुंडसेन यांच्यामध्ये जरी दोन ध्रुवांमधील खरोखरीचे अंतर होते, तरी ते समान दर्जाचे वीरगडी होत. उलट तीन वेळा पृथ्वीप्रदक्षिणा करणारा कॅ. कुक् कोणीकडे आणि केवळ दक्षिण-ध्रुववृत्ताच्या आसपास असताना उत्तर-ध्रुव-बिंदू गाठला म्हणून बेधडक सांगणारा कुक् कोणीकडे!

याच सुमारास 'दि सदर्न क्रॉस' नावाचे जहाज घेऊन नॉर्वेचा नाविक बॉर्कग्रेव्हिक हा इंग्लंडहून निघाला. याला सर जॉर्ज न्यून्स या इंग्लिश सरदाराने पाठविले होते. तो केप अडेअर या भूशिरापाशी येऊन उतरला. १८९९ सालचा हिवाळा त्याने मुद्दामच येथे घालविला. त्याच्या बरोबर निकोलाय हॅन्सन नावाचा त्याचा एक देशबांधव सृष्टिज्ञानविशारद असा होता. या मुक्कामात त्यांना या प्रदेशातील बऱ्याच गोष्टींचे निरीक्षण करता आले. पण दुर्दैवाची गोष्ट अशी झाली की, निकोलाय हॅन्सन हा येथेच मृत्यू पावला; आणि आश्चर्य करण्यासारखी जी एक गोष्ट घडली ती म्हणजे ज्या ठिकाणी त्यास पुरण्यात आले, त्या ठिकाणी कठिण खडक खणून काढीत असता त्याच्याच खाली गडप झालेली एक हिमनदी त्यांना सापडली!

या लोकांच्या निरीक्षणात आणखी ज्या गोष्टी प्रत्ययास आल्या, त्या पुढीलप्रमाणे :– दक्षिण-ध्रुव-प्रदेश किंवा उत्तर-ध्रुव-प्रदेश यांतील हिवाळ्यामधील थंडीच्या प्रमाणात किंवा कडकपणात फारसा फरक नसतो. परंतु उत्तर-ध्रुव-प्रदेशात भर हिवाळ्यातही हिमराशींवरून भटकत असणारे शुभ्र अस्वल, ध्रुव-जंबूक, हिम-हरिण, कस्तूरी-वृषभ असले पशू किंवा

टर्मिगॅन् ग्विलेमॉट यांसारखे पक्षी या भागात त्यांना आढळले नाहीत. मनुष्य-प्राणी तर मुळीच कोठे दिसला नाही. तथापि जलसिंह, जलव्याघ्र, देवमासे इत्यादीजलचरांच्या पुष्कळ जाती जलाशयांतून वावरताना त्यांना दिसत; आणि या जलचरांच्या शिकारीनिमित्तच दक्षिण-ध्रुव-प्रदेशाकडे शिकारी लोकांच्या नावा प्रथम प्रथम येऊ लागल्या, हे वर सांगितलेच आहे. पेन्‌ग्विन नावाचे, उभ्या केलेल्या पांढऱ्या शुभ्र पिशवीच्या आकाराचे पक्षी या भागात पुष्कळ राहतात—पुष्कळ म्हणजे लाखां-लाखांनी यांचे कळप मोजावेत! या पक्ष्यांना पोहता येते, डुलत चालता येते, पण उडता मात्र येत नाही. यांचे पंख म्हणजे हातोपेच! पोहण्यात त्याचा उपयोग होतो. हे पक्षी उभे राहिले म्हणजे बुटक्या विदूषकासारखे दिसतात. यांचा पुढचा भाग पांढरा शुभ्र असून पाठीचा व डोक्याचा भाग काळा कुळ-



कुळीत दिसतो. जणू काय या बुटक्या विदूषकी पक्ष्यांनी अंगांत लांब बाह्यांचे पांढरे सदरे घातले असून त्यावरून प्रोफेसराप्रमाणे काळे कोट

अडकविले आहेत! एकदा तर अशा प्रकारचे लाखो पक्ष्यांचे थवे सतत चौदा दिवस अहोरात्र त्यांच्या समोरून चालले होते; केवढे हे अफाट सैन्य!

असो. बार्कग्रेव्हिंक याने आपल्याबरोबर एका सोबत्यास घेऊन बिनचाकी गाडीच्या साहाय्याने बर्फावरून जवळजवळ ७९ व्या अक्षवृत्तापर्यंत प्रवास केला; पण पुढे तसेच न जाता तेथूनच तो परत फिरला.

विसावे शतक उजाडले. अद्यापि उत्तर-ध्रुव-बिंदूचा शोध लागला नव्हता. तिकडे नॅन्सेन, अमुंडसेन, पेअरी इत्यादी नावाजलेल्या नाविकांचे प्रयत्न चालू होतेच. त्याचप्रमाणे दक्षिण-ध्रुव-बिंदूचा शोध लावण्याकरिता कॅ. स्कॉट, ले. शॅकल्टन् आणि अमुंडसेन यांचे जिवापाड श्रम सुरू झाले होते. आपणांस या तिघांनी केलेल्या सफरीचा वृत्तांत काहीसा विस्तारपूर्वक सांगावयाचा आहे.

## कॅ. स्कॉटची पहिली सफर

१९०१ साली 'दि रॉयल् जिऑग्रेफिकल सोसायटी' आणि 'दि रॉयल सोसायटी' या दोन भौगोलिक संस्थांच्या पुरस्काराखाली 'दि डिस्कव्हरी' हे जहाज घेऊन कॅ. स्कॉट हा दक्षिण ध्रुवाकडे जाण्यास निघाला. ही सफर यशस्वी व्हावी म्हणून त्याला इंग्लंडच्या सरकाराकडून आणि इतर धनिकांकडूनही द्रव्याचा भरपूर पुरवठा करण्यात आला होता. स्वतः कॅ. स्कॉट हा पहिल्या प्रतीचा धीट व धाडशी होताच; शिवाय त्याजबरोबर त्याच्याच तोडीचे ले. अर्नेस्ट शाकल्टन् व डॉ. विल्सन यांसारखे अत्यंत कष्टाळू व सहनशील असे साथीदार होते. त्यांचे जहाज थेट इंग्लंडहून निघून आफ्रिकेस वळसा घालून प्रथम सरळ आस्ट्रेलियाच्या पूर्वेस न्यू झीलंड बेटापाशी आले; तेथून १९०१ च्या नाताळच्या सणात, म्हणजे दक्षिण गोलार्धातील भर उन्हाळ्यात अँटार्क्टिक महासागरात

त्याने प्रवेश केला; व १९०२ च्या जानेवारी महिन्याच्या २१ तारखेस 'मॅकमुर्डो' नावाच्या सामुद्रधुनीत येऊन ते दाखल झाले. येताना या जहाजास दगडाहूनही कठिण अशा हिमतटांच्या जणू चक्रव्यूहाप्रमाणे रचिलेल्या रांगांतून आणि त्यामधून वेगाने वाहणाऱ्या प्रवाहातून वाट काढावी लागली. तथापि या जहाजाची बांधणी भरभक्कम अशा ओक लाकडाची मुद्दाम करून घेतली असल्यामुळे, प्रवाहातून वाहत येणाऱ्या असंख्य हिमखंडांशी टक्कर सोसूनही ते अखंड व दणदणीत राहिले; यामुळे आपली सफर पूर्ण होईपर्यंत त्यातून आपला निभाव सहज लागेल असा यांना भरवसा आला.

ज्या वेळी यांचे जहाज 'मॅकमुर्डो' सामुद्रधुनीत आले, त्या वेळी तेथील हवा अपेक्षेबाहेर स्वच्छ असल्यामुळे त्यांना त्यांच्यासमोर हिम-तटांनी वेढलेला किनारा, पलीकडील हिमाच्छादित पर्वतांच्या रांगा, आणि त्यांची सूर्यप्रकाशात तळपणारी धवल शिखरे दूरवर दिसत होती. या लोकांनी किनाऱ्याकिनाऱ्याने प्रवासास सुरुवात केली. तेव्हा १६५ रेखांशाच्या आसपास त्यांना दोन तीन हजार फूट उंचीचे हिमपठार आढळले. त्यांस त्यांनी 'किंग एडवर्ड दि सेव्हन्थ' हे नाव दिले. किनाऱ्याकिनाऱ्याने जात असता त्यांना पेनग्विन पक्ष्यांचे आरवणे ऐकू येई. तसेच जलसिंह व जलव्याघ्र यांचे थवे भेटत. फेब्रुवारी महिन्यात या लोकांनी रॉस बेटावर तळ दिला; आणि तेथून सभोवतालचा प्रदेश शोधण्यासाठी स्कॉटने नाविकांच्या वेगवेगळ्या टोळ्या करून त्यांना पाठविण्यास आरंभ केला.

एके दिवशी नऊ नाविकांची एक टोळी शेजारच्या बादशाही पेनग्विन पक्ष्यांची वसाहत पाहण्यासाठी गेली होती. तेथे विस्तृत हिमपठारावर जोडीजोडीने बसलेल्या लाखो पक्ष्यांचा थवा पाहून त्यांना अपूर्व असा आनंद वाटला. तो एक विलक्षणच देखावा होता ! एखादा

पर्वणीच्या वेळी गंगेच्या घाटावर स्नानार्थ अलोट स्त्री-पुरुषांचा मेळा लोटतो तेव्हा, किंवा चंद्रभागेच्या वाळवंटात सर्वत्र फुलून गेलेल्या असंख्य दिंड्या भजन करीत असतात तेव्हा, तेथील देखावा जसा वैभवपूर्ण दिसतो त्याच प्रकारचा हा देखावा होय. पण हा देखावा निस्तब्ध असा होता. जणू काय लाखो योगी जोडीजोडीने समाधी लावूनच बसले होते !

परत येताना या लोकांचे मात्र प्राणांतिक हाल झाले. बहुतेकांनी पाताळलोकच गाठला होता म्हणावयाचे ! पण त्यातून ते कसेबसे निभावले. तो भयप्रद प्रसंग असा :—इंद्राने जणू मेघास्त्र सोडल्याप्रमाणे एकाएकी वादळी हवा उत्पन्न झाली, आणि सर्वत्र दाट धुके पसरू लागले. ते इतके की, आपल्यापुढे एका पावलावरसुद्धा त्यांना काहीच दिसेनासे झाले; त्यातच गारांचा वर्षाव होऊ लागला व सोसाट्याचा वारा सुटला. प्रदेश हिम-पठाराचा. अशा हिममय प्रदेशात हिमाच्छादित उतरंडींच्या पलीकडे अनंत खोल खिंडारे असतात; आणि उतरंडीवरून एकदा का पाय घसरू लागले म्हणजे मनुष्याला आपले अंग सावरता येत नाही. इतकेच नव्हे, तर प्रत्येक क्षणी त्या घसरणाऱ्या मनुष्याचा वेग वाढत जातो; आणि अखेर कड्याखालील खोल खिंडारात तो निर्दयपणे फेकला जातो ! मग त्यातच वरून कोसळणाऱ्या हिमराशीखाली तो कायमचा गाडलाही जातो ! ही एक प्रकारची हिम-समाधीच होय !

हे नऊ नाविक धुक्यातून निसरड्या बर्फावरून आपली वाट चाचपडत चालले असता त्यांच्यापैकी हेअर नावाचा मनुष्य एकाएकी दिसेनासा झाला. तो कोठे गेला म्हणून ते सर्व साशंक होतात तो इव्हॅन्स याचा पाय निसरल्यामुळे तो घसरगुंडीलाच लागला. बार्ने नावाच्या त्याच्या पुढाऱ्याच्या लक्षात ही गोष्ट आली. ज्या घसरंडीवरून इव्हॅन्स हा घसरत चालला होता, ती बेताचीच असावी

असे त्यास वाटल्यामुळे तो त्याच्यामागून सावधपणे जाऊ लागला; पण त्याची कल्पना चुकीची ठरून तोही अतिवेगाने उतारावरून घरंगळू लागला. ते एकमेकांपासून थोड्या अंतरावर, पिंजलेल्या कापसासारख्या मऊ अशा हिमकणांच्या राशींवर येऊन पडले होते आणि घाबरत घाबरत एकमेकांशी कुशलप्रश्न विचारीत होते, तोच कॉर्टली नावाची तिसरी एक व्यक्ती त्या दोघांच्या मधोमध येऊन आदळली !



त्यांना ती घसरण परत चढून जाणे तर अशक्यच होते. ते तिघे एकमेकांना अगदी बिलगून उभे राहिले. त्या तिघांचे खरोखर सुदैव की, जरी काळ आला होता तरी वेळ आली नव्हती. कारण, ते ज्या जागेवर उभे होते ती जागा म्हणजे उतरण संपल्यावर लागणाऱ्या एका तुटलेल्या कड्याचा पायरीवजा माथा होता. त्या जागेपासून जेमतेम पाच सहा हातांवरच इतका खोल कडा होता की, तेथून खाली नजरच

पोहोचत नव्हती ! शिवाय त्या चिंचोळ्या खोल खिंडारात हिम कोसळून पडत होते. वरच्या बाजूस उभी उतरण आणि खालच्या बाजूस खोल कडा यामुळे 'इकडे आड, तिकडे विहीर' अशी अक्षरशः त्यांची बिकट स्थिती झाली होती. तो भीषण प्रकार पाहून ती त्रयी अंतर्यामी तर कचरलीच. इतक्यात वरून त्यांच्याबरोबर असलेल्या कुत्र्यांपैकी एक कुत्रा जो वेगाने कोलांट्या खात खात खाली आला तो थेट कड्याखाली फेकला गेला, आणि पार तळाशी असलेल्या अंधारमय पोकळीत गडप झाला !

या तिघांना पुढे काय करावे असा बिकट प्रश्न पडला असता पठारावर असलेल्या बाकीच्या लोकांनी दुसऱ्या वाटेने परत आपल्या जहाजाकडे जाण्याचे ठरविले, पण त्यांचीसुद्धा कमी दैना झाली नाही. अतिशय सावधगिरी बाळगून दुसऱ्या एका हलक्या उतारावरून ते उतरू लागले नाहीत, तोच त्या उतारापलीकडे असलेली पोकळी आणि तिच्या तळाशी असलेल्या समुद्राच्या उसळणाऱ्या लाटा त्यांना दिसल्या. फ्रँक वाइल्ड हा सर्वांच्या पुढे होता. त्याने इतरांना थांबण्याबद्दल इशारा दिला खरा; पण त्याचा इशारा कानी पडण्याच्या आतच व्हिन्स नावाचा त्यांचा सोबती त्या निसरड्या उतारावरून जो घसरला तो पलीकडील पोकळीत दिसेनासा झाला ! पुनः बाकीचे उरलेले ते सर्व नाविक एकत्र येऊन एकमेकांच्या हातात हात घालून काही वेळ दिङ्मूढ होऊन स्तब्ध उभे राहिले; तो त्यांना काही अंतरावर–आता वादळ व धुके कमी होऊ लागल्यामुळे–हिमखंडांनी वेढलेली त्यांची ती 'डिस्कव्हरी' नौका अंधुक अशी दिसू लागली. घनांधकारात सांपडलेल्या गर्भगलित मनुष्याला ज्याप्रमाणे एखादा मिणमिणीत दिवा पाहूनही धीर येतो, त्याप्रमाणे दिङ्मूढ झालेल्या नाविकांना आपली नौका पाहून थोडा धीर आला. शिवाय नौकेच्या दिशेने जो उतार होता, तो कमी घसरणीचा

असून त्याच्या पलीकडे तुटलेला कडाही नव्हता, तर तो उतार क्रमाक्रमाने समुद्रतीरापर्यंत उतरत गेलेला होता.

हे लोक 'डिस्कव्हरी' नौकेवर जिवानिशी पोचल्यावर चुकलेल्या लोकांच्या शोधार्थ काही ताज्या दमाच्या लोकांना दोरखंड, काठ्या वगैरे साहित्यासह पाठविण्यात आले. बार्न, इव्हॅन्स व कॉर्टली यांना अगदी योग्य वेळी मदत मिळाली. नाहीतर त्यांना जिवंत परत येण्याची आशाच नव्हती! तुटलेल्या कडयावरच कुडकुडत बसून सापळ्यात अडकल्याप्रमाणे वरून पडणाऱ्या हिमराशींखाली गाडून घेण्यापेक्षा कडयाच्या काठाकाठाने मोठया सावधपणे मनाचा हिय्या करून ते तिघे हातास हात धरून जाऊ लागले. त्यांनाही कडयाच्या खाली दूरपर्यंत पसरलेला खवळलेला समुद्र शांत होत चाललेला दिसला. पण समुद्र गाठावयाचा कसा? ते उभे होते त्या चिंचोळ्या जागी छत्रीसारखा कड्याचाच एक भाग त्यांच्या डोक्यावर आला होता. ती थोडी निवाऱ्याचीही जागा होती; म्हणून तेथेच ते तिघे एकमेकांना बिलगून चिंताग्रस्त होऊन उभे राहिले. पण काही वेळाने त्यांच्या शोधार्थ निघालेल्या लोकांची व त्यांची दृष्टादृष्ट झाली व त्यांची त्या भीषण जागेतून एकदाची मोठ्या प्रयासाने सुटका झाली! ही झाली या तिघांची कथा.

व्हिन्सचा कपाळमोक्षच झाला होता! पण अगदी पहिल्या प्रथम हेअर जो नाहीसा झाला होता तो दोन दिवसांनी जहाजापाशी कसाबसा परत आला! धुक्यात व वादळात त्याची वाट चुकल्यामुळे व परत कसे व कोणीकडे जावयाचे याचे भान त्यास न राहिल्यामुळे, एके ठिकाणी काही खडक कसेबसे रचून त्याने एखाद्या भिंतीसारखा त्यांचा आडोसा केला होता; व तेथेच तो जवळजवळ ३६ तास निश्चेष्ट पडून राहिला होता! तो जागा झाला तेव्हा वादळी हवा नव्हती; म्हणून तो होता तेथून दूरवर असलेले 'डिस्कव्हरी' जहाज त्याला दिसले. त्याच्या

अनुरोधाने, पण मोठ्या कष्टाने ( कारण दोन दिवस त्याच्या पोटात काही अन्न नव्हते म्हणून ) तेथपर्यंत तो कसाबसा येऊन पोचला.

उन्हाळा संपून हिवाळ्यास आरंभ झाला. यापुढे या भागात चार महिने सूर्य दिसावयाचा नव्हता! एप्रिल, मे, जून व जुलै हे ते चार महिने होत. तेव्हा बसून करावयाचे काय असा या लोकांपुढे एक प्रश्नच होता. जेवणखाण, बोलणेखेळणे, वाटेल तेव्हा झोपणे, आणि अधूनमधून शास्त्रीय गोष्टींचे निरीक्षण करणे इत्यादी नित्याचे कार्यक्रम त्यांचे चालू होतेच. पण विशेष करमणुकीकरिता त्यांनी एक नाटक बसविले; आणि 'दि रॉयल टेरर थिएटर' नावाच्या तात्पुरत्या बनविलेल्या नाटकगृहात त्यांनी मोठ्या उत्साहाने त्याचा एक प्रयोगही केला. ले.कर्नल शॅकल्टन् याने एक हस्तलिखित मासिकही काढले!

जसा ऑगस्ट महिना उजाडला तसा उन्हाळा सुरू झाला. तेव्हा बिनचाकी गाड्यांच्या साहाय्याने स्वतःच्या नेतृत्वाखाली एकदोन निवडक नाविकांना घेऊन शक्य तितके दक्षिणेकडे जावयाचे असे कॅ. स्कॉट याने ठरविले. जवळजवळ दोन महिने सर्व प्रकारची तयारी करण्यात त्याने घालविले. मॅकमुर्डो सामुद्रधुनीपासून दक्षिण-ध्रुव-बिंदू गाठावयाचा म्हणजे अगदी नाकासमोर गेल्यासही सुमारे ९०० मैलांचे अंतर त्यांना तोडावे लागणार होते. कॅ. स्कॉटने आपल्याबरोबर ले. शॅकल्टन व डॉ. विल्सन या दोघांनाच घेतले, आणि चार बिनचाकी गाड्या ओढण्याकरिता सुमारे वीस कुत्री घेतली. प्रथम पंधरा एक दिवस या लोकांना अन्न व इतर सामानसुमान पुरविण्याकरिता इतर काही नाविक लोक यांच्या बरोबर गेले; पण पंधरा दिवसांनी ते लोक परतले. परत येताना टप्प्याटप्प्यावर अन्न, चरबी, तंबू, काठ्या, दोरे वगैरे उपयोगी वस्तू यांचे साठे या लोकांनी ठेवावे असे ठरले होते, त्याप्रमाणे त्यांनी केलेही. या साठ्यांचा उपयोग स्कॉट, शॅकल्टन व विल्सन यांना परत

येते वेळी व्हावा असा त्यांत उद्देश होता. नोव्हेंबर २ तारखेस हे तिघे सर्वांचा निरोप घेऊन पुढच्या प्रवासास निघाले. जरी ह्या सर्व प्रदेशावर हिमाचे थर पडलेले होते तरी तो प्रदेश एकजात सपाट नव्हता म्हणून, आणि जे हिम पडलेले होते ते अद्याप घट्ट झाले नव्हते म्हणून, त्या भुसभुशीत हिमराशींतून आणि उंचसखल भागांवरून गाड्या ओढून नेण्यास अतिशय श्रम पडू लागले. बरोबर घेतलेले सामान नेण्यास त्यांना तीन तीन हेलपाटे घालावे लागू लागले. त्यात पुनः वादळ, धुके व गारा; आणि कुत्रीही बंड करून मधूनमधून त्रास देत. काही कुत्री तर मृत्युमुखी पडली ! तथापि हे तिघे वीरगडी नेहमीच आनंदी, धैर्यशील व उल्हासी असत. उदासीनता ही कशी त्यांना माहीतच नव्हती. सुमारे १५ दिवसांनी ते ७९ व्या अक्षवृत्तापर्यंत येऊन थडकले. येथपर्यंत अद्यापि कोणीच आले नव्हते. आणखी काही दिवस ते तसेच पुढे गेले; आणि नोव्हेंबरच्या २५ व्या तारखेस त्यांनी ८० वे अक्षवृत्त गाठले. अद्यापि ध्रुवबिंदू दहा अक्षांश दूर होता. येथून सर्व प्रदेश सभोवार एक जात पांढऱ्या शुभ्र हिमथरांचा बनला आहे. म्हणून कोणीकडेही दृष्टी टाकली तरी त्यांना तोच तोच भयाण देखावा दिसे! मात्र सर्वच प्रदेश सारख्या सपाटीचा नाही. येथेही त्यांना पर्वताच्या रांगा आढळल्या. त्यांच्या उजव्या हाताला, म्हणजे पश्चिम दिशेला जणू शुभ्र संगमरवरी विशाल शिलाखंड रचून मुद्दामच तयार केली आहे की काय अशी दिसणारी एक पर्वतश्रेणी लागली. या पर्वत श्रेणीची बरीच शिखरे दहादहा, बाराबारा हजार फूट उंचीची असून अत्युच्च शिखर १५,००० फूट उंचीचे आहे. यास त्यांनी माउंट मारखॅम हे नाव दिले.

अशा उंचसखल भागांतून बिनचाकी गाडी ओढत नेणे अत्यंत कष्टाचे काम असते. कधीकधी या लोकांचा सबंध दिवसाचा प्रवास तीन चार मैलच भरे ! एके दिवशी तर त्यांना सारे दोन मैलच जाता

आले. नोव्हेंबर महिना संपला. डिसेंबरही आला गेला. तरी त्यांना दोन अक्षांशाच पुढे जाता आले! १९०२ च्या डिसेंबरच्या ३० व्या तारखेस ते दक्षिण अक्षांश ८२°, १७ या ठिकाणी होते. पुढे जावयाचे त्यांच्या मनात फार होते; पण जवळचे अन्न व इतर लागणारे साहित्य अपुरे पडेल अशी भीती उत्पन्न झाल्यामुळे तेथूनच परत फिरण्याचे कॅ. स्कॉट व त्याच्या सोबत्यांनी ठरविले. यात यांनी एक प्रकारचा दूरदर्शीपणाच दाखविला यात शंका नाही.

परत येताना त्यांचे जास्तच हाल झाले. शॅकल्टन हा स्कर्व्ही नावाच्या रोगामुळे केवळ अशक्तच नव्हे, तर परावलंबी झाला होता. कुत्र्यांनाही गाड्या ओढवेनात. तंबू ठोकून वस्तीला राहिल्यानंतर केव्हा केव्हा अपरात्री सोसाट्याचे वारे सुटत आणि त्यामुळे तंबू कोलमडून पडे. तेव्हा तो परत उभा करणे अशक्य होई. थंडीच्या कडाक्यामुळे बोटे अक्षरशः तुटण्याची पाळी येई! पडलेला तंबू कसाबसा अर्धवट उभा करून ते उरलेली रात्र कष्टाने काढीत. उजाडले म्हणजे पुढचा मार्ग आक्रमावयाचा तो जेमतेम भूक भागेल एवढेच खाऊन. जाताना ठिकठिकाणी त्यांनी अन्नसामग्री ठेविली होती खरी; पण अशक्ततेमुळे एका टप्प्याहून दुसरा टप्पा गाठावयाचा म्हणजे अंदाजापेक्षा दुप्पट तिप्पट जास्त दिवस लागू लागल्यामुळे त्यांना अर्धपोटीच दिवस घालवावे लागत! याप्रमाणे कष्ट काढीत १९०३ साली फेब्रुवारी महिन्याच्या ३ऱ्या तारखेस ही मंडळी मॅकमुर्डो सामुद्रधुनीत 'डिस्कव्हरी' जहाजात वाट पाहत बसलेल्या आपल्या सोबत्यांना येऊन परत भेटली! सर्वांना फार आनंद झाला. याच सुमारास जुलै महिन्यात (१९०२) लंडनहून त्यांना मदत करण्याकरिता निघालेले जहाज 'दि मॉर्निंग' हे येथे आले होते. ते परत जावयाचे तेव्हा ले. क. शॅकल्टन यास स्वदेशी काही काळ विश्रांतीकरिता महत्प्रयासाने त्याचे मन वळवून पाठविण्यात आले.

कॅ. स्कॉट, डॉ. विल्सन् व इतर नाविक यांनी पुनः एक संपूर्ण वर्ष मॅकमुर्डो सामुद्रधुनीच्या काठी घालविले. पण या अवधीत दक्षिणेकडे जाऊन ध्रुवबिंदू गाठण्याचा प्रयत्न त्यांनी केला नाही, तर आजूबाजूच्या प्रदेशाचे, भूगोलशास्त्र, वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र, ज्योतिषशास्त्र, भूगर्भ-शास्त्र इत्यादी अनेक दृष्टींनी निरीक्षण केले. हिवाळ्यातील चार महिन्यांची सलग रात्र संपल्यावर पश्चिमेकडे पसरलेल्या पर्वतश्रेणीचा प्रदेश शोधण्यासाठी स्कॉट निघाला. पण तो ६००० फूट उंचीचा प्रदेश चढून जाता जाता त्याच्या सर्व बिनचाकी गाड्यांचे दांडे पटापट मोडू लागले! त्यामुळे खट्टू होऊन त्यांना ठिकाणावर परत यावे लागले. २६ सप्टेंबर रोजी पुनः ते जय्यत तयारीने निघाले; आणि पुनः जर दांडे मोडले तर मागे न फिरता पायी तसाच पुढे प्रवास करावयाचा असा त्यांनी निश्चयच केला. ऑक्टोबर महिना विशेष तापदायक गेला नाही; पण नोव्हेंबरच्या आरंभीच एक उभी चढण चढत असता धुके, गारा व वारा यांच्या असह्य माऱ्यास सुरुवात झाली! आधीच चढण, त्यात काही गाड्यांचे दांडे पुनः तुटले. पण सामान टाकून तरी कसे जावयाचे? थंडीने बोटे तुटण्याची पाळी आली! तथापि तसेच ओझे उचलून घेऊन ते वीर पुढे निघाले. काही अंतर चढून गेल्यावर त्यांना एक प्रचंड खडक आढळला. परंतु तो अनेक वर्षे पडत आलेल्या हिमराशींचा थिजून थिजून बनलेला होता. या खडकाचा आश्रय करून तेथे विश्रांती घेण्याचे त्यांनी ठरविले. तथापि वादळाचा जोर इतका होता की, त्या प्रशस्त हिमशिलेचा आश्रय असताही तंबू उभा करता करता त्यांच्या नाकी नव आले! अनेक वेळा दोर तुटत, खुंट्या उपटत, खांब कोलमडून पडत; पण शेवटी एकदा त्यांच्या प्रयत्नास यश आले! आठ दिवस त्यांना तंबूतच बसून काढावे लागले! बाहेर पडण्याची सोयच नव्हती. आपल्या इकडे कोकणात ज्याप्रमाणे एखाद्या वेळी महिना न महिना सूर्यदर्शन

न होता एकसारखा रिपरिप पाऊस पडत असतो, त्याप्रमाणे येथे आठ दिवस अहोरात्र गारा पडत होत्या आणि सोसाटयाचा वारा वाहत होता. वारा वाहत होता म्हणून तर एका अर्थी चांगले झाले. कारण, वाऱ्याच्या जोराने त्या गारा उताराकडे लोटल्या जात होत्या. नाहीतर यांचा तंबू गारांच्या ढिगाखाली बेपत्ता झाला असता. अक्षरशः रोजचे चोवीस तास यांना आपापल्या अंथरुणाच्या पिशवीत पडून राहावे लागले! याप्रमाणे आठ दिवस लोटले. शेवटी ते अगदी कंटाळले व रडकुंडीला आले. पण करतात काय बिचारे! काहीच हालचाल करता येईना. या गोष्टीची त्यांना चीड आली होती. परंतु आठ दिवसानंतर या हिमवादळाचा जोर कमी झाल्यावर ते जास्त वाट न पाहता पुढे जाण्याकरिता निघाले. त्यांची प्रकृती या आठ दिवसात ढासळली होती ते मात्र परत तळावर आले. नोव्हेंबरअखेर स्कॉट व त्याचे सोबती एकसारखे हिमकणांच्या राशींतून मार्ग काढीत प्रवास करीत होते. नोव्हेंबर ३० तारखेस मात्र जेथपर्यंत ते गेले होते तेथेच आपला प्रवास संपवून परत फिरण्याचे त्यांनी ठरविले. ज्या पठारावरून त्यांनी सतत एक महिना प्रवास केला, त्या सर्व प्रदेशात त्यांना हिमाच्या लहानमोठया राशींशिवाय काहीच आढळले नाही. गवत नाही की शेवाळ नाही! मग झाडझुडूप कोठले? त्याचप्रमाणे पशू नाही, पक्षी नाही, की कीटक नाही. वर आकाश आणि सभोवती हिमाच्या राशी असे हे एक विस्तृत ओसाड हिम-पठार हजारो मैल लांब व रुंद पसरलेले आहे! असे ते आज किती तरी वर्षे तेथे आहे; आणि यापुढे आणखी किती तरी वर्षे ते तेथे तसेच राहणार आहे!

'डिस्कव्हरी' जहाजापासून हे लोक जवळजवळ २८० मैल दूर आले होते व समुद्रसपाटीपासून ९००० फूट उंचावर होते. केवळ चिकाटी, बळकटी व सहनशक्ती यांच्या जोरावर त्यांनी हा कष्टमय व लांबचा प्रवास केला होता. डिसेंबरच्या १९ व्या तारखेस



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे,
०५७५०

ते परतले. येताना वेगळ्याच प्रकारच्या अडचणी उत्पन्न झाल्या. घसरगुंडीवरून निसरणे, खिंडारात पडणे आणि भुसभुशीत हिमकणांच्या राशींतून वाट काढणे, या त्या अडचणी होत. तथापि नेमके नाताळचा सण सुरू होण्याच्या अगदी अधल्या दिवशी संध्याकाळी ते सर्व दमले भागलेले प्रवासी वीर आपल्या जहाजावर परत आले! स्कॉटने या भागातील आपली ही पहिली सफर पुढे एक दोन महिन्यातच संपविली; आणि १९०४ च्या फेब्रुवारी अखेर तो न्यू झीलंडकडे निघून गेला व त्याचे इतर अनुयायी स्वदेशी परत गेले.

# ध्रुव-प्रदेशांचा शोध

## दक्षिण-ध्रुव-बिंदूवर !

## ले. शॅकल्टन् याची दुसरी सफर

१९०२ साली ले. शॅकल्टन् याची प्रकृती अतिशय ढासळली होती म्हणून त्यास मोठ्या जुलुमाने स्वदेशी विश्रांती घेण्याकरिता पाठविण्यात आले होते. जवळ-जवळ चार वर्षे तो स्वदेशीच राहिला. प्रकृती पूर्णपणे निकोप होण्यास त्याला एवढा कालावधी लागला; पण मग मात्र त्याला स्वस्थ बसवेना, दक्षिण महासागरातील रॉस बेटापर्यंत जाऊन तेथेच पूर्वीप्रमाणे तळ देऊन तेथून ध्रुवबिंदू गाठावयाचा अशी त्याच्या मनाने पुनः उचल घेतली; आणि आपल्याकडेच पुढारीपण घेऊन 'निमरॉड' नावाच्या जहाजातून इंग्लंडाहून तो ऑगस्ट १९०७ साली निघाला. बरोबर निवडक नाविक लोक होतेच. शिवाय ऑस्ट्रेलियाहून प्रो. डेव्हिड, डॉ.मॉसन् यांसारखे काही काही नामांकित शास्त्रज्ञही त्याच्याबरोबर जावयास निघाले. हे सर्व प्रथम न्यू झीलंड बेटास गेले. तेथून १९०८ साली जान्युआरी महिन्याच्या १९ व्या तारखेस, म्हणजे ख्रिस्ती लोकांच्या वर्षप्रतिपदेस पुढे जाण्यास ते निघाले. 'निमरॉड' जहाज काही आठवड्यां-

नंतर मॅकमुर्डो सामुद्रधुनीत येऊन दाखल झाले. कॅ. स्कॉटने तेथे ज्या ठिकाणी तळ दिला होता तेथून २० मैलांवर ले. शॅकल्टन् याने आपला तळ देऊन 'निमरॉड' जहाजास परत पाठविले.

मार्च महिना उजाडला. हिवाळ्यास नुकताच प्रारंभ झाला होता. अद्यापि कडक थंडीची, काळोखी व लांबच लांब रात्र सुरू व्हावयाची होती. या सुमारास ले. ॲडॅम्स, प्रो. डेव्हिड, डॉ. मॉसन, डॉ. मॅके, डॉ. मार्शल् आणि सर फिलिप ब्रॉकल्हर्स्ट यांनी 'माउंड इरेबस' या ज्वालामुखी पर्वताच्या शिखरावर स्वारी केली. त्यांना सारे वीस मैलांचेच अंतर चालून जावयाचे होते; तरी पण त्यांना चढ चढावयाचा असल्याने सहा दिवस लागले. ९००० फूट उंच चढून गेल्यावर भयंकर वादळ झाले; आणि दीड दिवस त्यांना आपापल्या पिशव्यांतून पडून राहावे लागले. वादळ संपल्यावर उरलेले चार साडेचार हजार फूट ते चढून गेले व ज्वालामुखीच्या मुखाकाठी उभे राहिले. काठ कसला? मुखाचा ओठच तो! मुखावाटे वाफेचे लोटचे लोट तळापासून एक हजार फूट वर फेकले जात होते! प्रत्येक लोट वर येण्याच्या आधी भयंकर गडगडाट होई आणि सर्वत्र गंधकाचा दर्प भरून राही. या पर्वताचे मुख अर्धा मैल रुंद असून सुमारे एक हजार फूट खोल असावे, असे त्यांना निरीक्षणानंतर आढळून आले.

यानंतर कडक हिवाळा सुरू झाल्यामुळे सहा महिने सर्वांना स्वस्थ बसूनच राहावे लागले. पण हिवाळा संपून उन्हाळा सुरू होताच, म्हणजे ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात प्रो. डेव्हिड, डॉ. मॉसन् आणि डॉ. मॅके ही त्रयी व्हिक्टोरिया भूपठारावर असलेल्या दक्षिण-लोहाकर्षक ध्रुवबिंदूच्या शोधार्थ गेली. सतत दोन तीन महिने कष्टाचा प्रवास करून १५ जान्युआरी १९०९ च्या सुमारास त्यांनी तो बिंदू गाठला!

इकडे ले. शॅकल्टन् हा आपल्याबरोबर ॲडॅम्स, मार्शल आणि वाइल्ड् या तिघा सोबत्यांना घेऊन सर्व प्रकारच्या जय्यत तयारीनिशी तीन महिने पुरेल एवढी अन्नसामग्री घेऊन ऑक्टोबरच्या २८ व्या तारखेस दक्षिण ध्रुव-बिंदू गाठावयास निघाला. शॅकल्टन् याने हिम-कुत्र्यांऐवजी चारच सायबेरियन तट्टे घेतली होती. कारण, कुत्र्यांपेक्षा तट्टांचा उपयोग जास्त होईल असा त्यांचा अंदाज होता.

पूर्वीच्या अनुभवामुळे एका महिन्याच्या आतच, म्हणजे नोव्हेंबर महिन्याच्या २६ व्या तारखेस, कॅ. स्कॉट ज्या अक्षवृत्तापर्यंत गेला होता तेथपर्यंत त्यांनी मजल मारली. या अवधीत त्यांच्यावर अडचणीचे किंवा जिवावरचे प्रसंग आले नाहीत असे नाही. ज्या तट्टांचा कुत्र्यापेक्षा जास्त उपयोग होईल असे त्याला वाटले होते, ती तट्टे हिमप्रदेशावरून जाण्यास निरुपयोगी ठरली. एक तट्टू तर ॲडॅम्ससह एका हिमखिंडारात गडपच झाले असते; पण मोठ्या मिनतवारीने त्यांना वाचविण्यात आले. मधून-मधून घनदाट धुके पसरे, तर केव्हा केव्हा वादळीवारे हात धुऊन पाठीस लागे. वाटेत ज्या ज्या ठिकाणी त्यांनी मुक्काम केले, त्या त्या ठिकाणी परत येताना उपयोगी पडावी म्हणून भरपूर अन्नसामग्री ते ठेवीत. अशा प्रकारच्या निर्जन–ना पशू, ना पक्षी–असलेल्या प्रदेशातून प्रवास करावयाचा म्हणजे अशीच तजवीज करून ठेवावी लागते.

यापुढील त्यांची वाट जास्त जास्त बिकट होऊ लागली. त्यांच्या थेट समोर, म्हणजे दक्षिणेस हिमाच्छदित अशी एक उंचच उंच पर्वतश्रेणी पसरली असल्याकारणाने त्यांना एक प्रकारची भीती वाटू लागली. कारण की, निसरडी, उतरडी, खोल खिंडारे व तुटलेले कडे यांनी गजबजलेल्या प्रदेशातून वाट काढणे किती कठिण व जिवावरचे असते याचा अनुभव ले. शॅकल्टन् यास मागे पूर्णपणे आला होता. तथापि अशा गोष्टींना डगमगणारा तो नव्हता; तर मनाचा हिय्या करून या अडचणींना न

जुमानता तसेच पुढे जावयाचे असेच ठरवून त्याप्रमाणे तो व त्याचे सोबती आपला मार्ग आक्रमू लागले.

डिसेंबर महिना उजाडला. येथील भर उन्हाळ्याचे हे दिवस. सूर्याची सतत पडणारी किरणे पांढऱ्या शुभ्र हिमराशींवर चौफेर तळपू लागल्या-कारणाने नुसत्या डोळ्यांनीं हिमराशींकडे पाहणे अशक्य होते. यामुळे तट्टांना आंधळेपणा प्राप्त झाला व ती निरुपयोगी ठरली.

डिसेंबरच्या ४, ५ तारखेच्या सुमारास त्यांच्यापुढे एक खोल दरी पसरलेली त्यांना दिसली. सर्वत्र हजार हजार फूट उंचीचे हिमाच्छादित व अत्यंत निसरडे कडे व उतरंडे असून त्यांमधून एक भली मोठी हिमनदी ध्रुवाकडे पसरलेल्या हिमपठारावरून संथपणे उत्तरेकडे सरकत होती. या हिमनदीस ‘ बिथर्ड मोअर ’ हे नाव यांनी दिले. डिसेंबरच्या ७ तारखेस ही सर्व मंडळी नेहमीप्रमाणे चालली असता वाइल्ड, त्याची बिनचाकी गाडी आणि त्याला जोडलेले तट्टू ही सर्व एकाएकी एका हिमखिंडारात दिसेनाशी झाली. वाइल्डची आरोळी ऐकून बाकीचे लोक तेथे येऊन पाहतात तो तट्टाने पार तळ गाठला होता, असे दिसले. हिम-शकट हिमखिंडारावर आडवा पडला होता म्हणून बरे. कारण, त्यामुळे वाइल्ड यास गाडीची एक कड धरून स्वतःचे शरीर तोलून धरता आले होते. हिम-शकट आडवा न पडता उभा पडला असता तर शकटावरील सर्व अन्नसामग्रीही हिमखिंडाराच्या तळाशी गेली असती आणि मग सर्वांना येथूनच परत फिरावे लागले असते.

‘ साहसप्रिय वीरांना नशीबही हात देते. ’ अशा अर्थाची जी म्हण आहे ती सत्य आहे. कारण, या प्रदेशातून प्रवास करीत असता कॅ. शॅकल्टन्, ॲडॅम्स व मार्शल यांच्यावरही वाइल्डप्रमाणेच हिम-खिंडारात पडण्याचे अनेकदा प्रसंग आले असता त्यातून ते सर्व निभावले. पुढे हिमनदीवरूनच त्यांनी आपला प्रवास चालविला. कारण, बाकीचा

प्रदेश एकजात कडे, उतरंडे आणि खिंडारे यानी भरून गेला असल्या-मुळे त्यातून प्रवास करण्यात आपली धडगत लागणार नाही, अशी त्यांना भीती वाटत होती. हिमनदी आज संपेल, उद्या संपेल, असा त्यांनी रोज अंदाज करावा, आणि तो रोज चुकून त्यांचा हिरमोड व्हावा व पुनः नवीन, डोंगराच्या रांगा व कडे आणि त्यातून वाहणारी ती हिमनदी त्यांना आढळावी असे कितीतरी दिवस चालले होते! वाटेत त्यांना काही काही ठिकाणी कड्यातून दगडी कोळशाचे थर आढळले यावरून या भागात फार फार पूर्वी अरण्ये असावी असा त्यांनी अंदाज बांधला. आणि तो सर्वस्वी खराही आहे. फार प्राचीन काळी पृथ्वीची उष्णता आता आहे यापेक्षा जास्त होती-इतकी की, त्यावेळी आज ज्या ठिकाणी आपणास हिमाच्छादित ध्रुवप्रदेश आढळतो त्या ठिकाणी अरण्ये होती. पण पुढे कालांतराने ही उष्णता इतकी कमी कमी होत गेली की, त्या ठिकाणी हिमप्रलय झाला व पूर्वीची अरण्ये गडप्प झाली! ही हिमनदी १३० मैल लांब आहे. याप्रमाणे दहा दिवस प्रवास केल्यावर ज्या पठारावरून हिमनदी खाली खोऱ्यात घसरत होती ते पठार त्यांना लागले. आता ते ८५ व्या अक्षवृत्तावर आले होते. मुख्य तळ सोडल्या-पासून परत जाताना आपल्यास उपयोग व्हावा म्हणून त्यांनी ठिकठिकाणी टप्प्याटप्प्यावर अन्न-सामग्री व इतर वस्तू ठेविल्या होत्याच. त्याप्रमाणेच समुद्रसपाटीपासून ६००० फूट उंचावर असलेल्या जगातील सर्वांत मोठ्या अशा या हिमनदीच्या उगमापाशी त्यांनी एक तळ दिला; व तेथे शक्य तितके सामान ठेऊन ते पुढच्या प्रवासास लागले. कारण शक्य तितके कमी सामान आपल्याबरोबर घेऊन दौडीने ध्रुव बिंदू गाठता आल्यास गाठावयाचा असा त्यांनी बेत केला होता. पठाराच्या माथ्यावर जाण्यास त्यांना अद्यापि ४००० फूट उंच चढून जावयाचे होते; आणि जरी हे भर उन्हाळ्याचे दिवस होते, तरी या माथ्यावरील उष्णतामान

नेहमी शून्य अंशा-खालीच असे. माथ्यावर गेल्यावर तेथील भयंकर वादळा-मुळे त्यांना दोन दिवस तंबूंतच निजून काढावे लागले; आणि त्यामुळे पुढे गेल्याने अन्नाचा तुटवडा पडेल की काय या भीतीने तेथूनच परतावे, असे एक दोन वेळा तरी त्यांच्या मनात येऊन गेले. तरी पण पुढेच जावयाचे असे ठरवून ता. १ जान्युआरी १९०९ रोजी ते द. ८७° व्या अक्षवृत्तावर येऊन दाखल झाले. जो जो ते ध्रुवबिंदूकडे जाऊ लागले तो तो वादळी वाऱ्याचा तडाखा आणि थंडीचा कडाका हे इतके वाढू लागले की, अति-शीत हवेमुळे प्रत्येकाच्या डोक्यातून व कानशिलातून विलक्षण कळा येऊ लागल्या ! अंगाचे तुकडे तुकडे पडतात की काय अशी त्यांना प्रतिक्षणी भीती वाटू लागली. तशात अन्नाचा एकदम तुटवडा पडू नये म्हणून ते रोज अर्धपोटीच राहू लागले. शेवटी वादळी वाऱ्यांचा जोर इतका वाढला की, त्यांची पाऊले पुढे पडण्याच्या ऐवजी त्यांची शरीरे तशीच काही वेळ तोलली जात व ते मागे फेकले जात. पुनः अडीच दिवस त्याना तंबूंत पिशव्यांतून स्वस्थ पडून राहणे भाग पडले. वादळ कमी होताच ते पुढच्या प्रवासास लागले. याप्रमाणे जरी ते अर्धपोटी आणि दमले भागलेले असे होते तरी नेहमी आपला उल्हास कायम ठेवून जान्युआरी ९ पर्यंत ते पुढेपुढेच प्रवास करीत गेले. त्या दिवशी सकाळी चार वाजताच उठून पुढच्या प्रवासास ते लागले; पण नवाच्या सुमारास १६२ व्या रेखावृत्तावर विषुववृत्तापासून ८८° २३' इतक्या अंतरावर ते येऊन ठेपले. पुनः वादळी वाऱ्याचा जोर अतोनात वाढला. इतका की, आता मात्र यापुढे जाण्याचे त्यांना फारच धोक्याचे वाटू लागले. म्हणून याच ठिकाणी आपल्या राष्ट्राचे 'यूनियन् जॅक' हे निशाण त्यांनी रोविले, महाराज्ञी अलेक्झँड्रा यांनी ते निशाण ले. शॅकल्टन् यांस दिले होते. मार्शल याने त्या निशाणाजवळ उभे असलेल्या इतर तिघांचा फोटो घेतला. नंतर निशाणास वंदन करून ते सर्व परत फिरले! जरी ते परत फिरले, तरी

येताना त्यांचे हाल कमी झाले असे नव्हे. अगदीच उपाशी पडून मरण्यापेक्षा टप्प्याटप्प्यावर ठेवलेल्या अन्नसामग्रीवर त्यांना अर्धपोटी, पावपोटी का होईना पण जिवंत परत येता आले.

ज्या ठिकाणी ले. शॅकल्टन्‌चे ' युनियन जॅक ' फडफडत होते, तेथून दक्षिण ध्रुवबिंदू सारा ९७ मैल दूर होता. आधीच विषुववृत्तापासून ९०° दूर असलेला हा ध्रुवबिंदू १०,००० फूट उंच असलेल्या पठारावर असल्यामुळे त्याच्या सभोवती नजर टाकावी तिकडे हिमखंडाशिवाय काहीच दिसत नाही. असा हा बिंदू गाठण्याचे यश जरी शॅकल्टन्‌ला आणि त्याच्या सोबत्यांना मिळाले नाही तरी १९११ सालच्या डिसेंबरच्या १४ व्या तारखेस कॅ. अमुंडसेन या नॉर्वेच्या नाविकाने ते संपादिले आणि पुढे बरोबर ३३ दिवसांनी स्कॉटला ते यश लाभले हे आश्चर्य नव्हे का? मात्र कॅ. अमुंडसेन ते सुयश मिळवून स्वदेशी परत येऊ शकला हे त्याचे परमभाग्य, आणि स्कॉट यांस आपल्या अनुयायांसह त्या प्रदेशातच इहलोकाची यात्रा संपवावी लागली हा दैवदुर्विलास! आपणांस आता तो वृत्तांत वाचावयाचा आहे.

### भाग्यशाली कॅ. रोल्ड अमुंडसेन

उत्तर ध्रुवबिंदू अगदी प्रथम गाठण्याबद्दल ज्याप्रमाणे अनेक युरोपियन्‌ राष्ट्रांच्या साहसी प्रवाशांमध्ये शतकानुशतके चढाओढ लागून राहिली होती, त्याप्रमाणे दक्षिण ध्रुवबिंदू पहिल्याप्रथम गाठण्याबद्दलही अनेक युरोपियन्‌ व अमेरिकन्‌ राष्ट्रांच्या साहसप्रिय प्रवाशांमध्ये एकोणिसाव्या व विसाव्या शतकांत उत्कट स्पर्धा लागून राहिली होती. या जगद्विख्यात प्रवाशांना ज्या त्या राष्ट्राच्या सरकाराकडून आणि सावकारांकडूनही भरपूर मदत मिळत असे, नाही असे नाही.

तथापि स्पर्धा सुरू झाल्यानंतर सर्वच स्पर्धमान प्रवाशांना हे अपूर्व यश ठेवलेले असते असे नाही. हा शेवटचा मान त्यापैकी एखाद्यालाच

मिळावयाचा असतो. अशा प्रकारेच उत्तर ध्रुवबिंदू गाठण्याचा मान कमांडर पेअरी यास सतत वीस वर्षांच्या आटोकाट परिश्रमाने मिळाला, हे आपण पूर्वी पाहिलेच आहे. असो*


कॅ. अमुंडसेन याचेही उत्तर ध्रुवबिंदू गाठण्याचे प्रयत्न सारखे सुरू होतेच. पण कॅ. पेअरीला हे यश लाभल्याचे वृत्त त्याच्या कानी येताच त्याने आपला मोर्चा एकदम अगदी दुसऱ्या टोकाकडे अक्षरशः वळविला. "उत्तर ध्रुवबिंदू नाही तर नाही, आपण दक्षिण ध्रुवबिंदू तरी गाठू," असे मनाशी ठरवून आपले आवडते 'फ्रॅम्' गलबत घेऊन तो १९१० च्या ऑगस्टमध्ये नॉर्वेहून जो निघाला तो त्याच वर्षी डिसेंबर महिन्यात 'रॉस' समुद्रात येऊन दाखल झाला; आणि १९११ च्या जान्युआरीत 'देव-माशां'च्या उपसागरात शिरून त्याच उपसागराच्या किनाऱ्यावरील हिमतटावर त्याने आपला मुख्य तळ दिला. पण या सुमारास तेथील उन्हाळा संपत येत असल्यामुळे पुढील सहासात महिने त्याला तेथे स्वस्थ बसून काढावे लागले. तथापि आपली सफर यशस्वी व्हावी म्हणून त्याच्या मनात अनेक प्रकारचे बेत चालू असावेत. पुढील प्रवासास उपयोगी पडावे म्हणून एव्हापासूनच वाटेतील टप्पे एकूण किती असावे व किती किती अंतरावर असावे, हे ठरवून त्याप्रमाणे

* कॅ. फ्रेडरिक् कुक् हा अद्यापि जिवंत असून आपणच उत्तर ध्रुवबिंदू प्रथम गाठला असे त्याचे म्हणणे आहे; व तसे त्याने नुकतेच (मार्च १९३६ च्या आरंभी) जाहीरही केले आहे. या गोष्टीची फेरतपासणी व्हावी, अशी त्याची म्हातारपणची अखेरची विनंती आहे. कारण आपल्या नावाला उगाच जो कालिमा लागला आहे तो निघाल्यास आपणास सुखाने मरण येईल असे त्यास वाटते. पण असे करणे आता एकतर्फी होईल. कारण, आता कॅ.पेअरी कोठे आहे? तरीही कॅ.फ्रेडरिक कुक् यानेच उत्तर ध्रुवबिंदू प्रथम गाठला असे सिद्ध झाल्यास दोघांचीहि सारखीच वाहवा व्हावी, असे या लेखकास वाटते. आणि तसे झाल्यास कॅ. कुक्संबंधी जे वावगे उद्‌गार प्रचलित माहितीवरून काढण्यात आले आहेत ते निमूटपणे परत घेण्यास त्याला आनंदच वाटेल.

मधूनमधून आपल्या अनुयायांना पाठवून या टप्प्यावर अन्नसामग्री व इतर जिनसांचा पुरवठा त्याने करून ठेविला होता. तरी पण केव्हा एकदा उन्हाळा सुरू होतो असे त्याला झाले होते. म्हणून विशेष वाट न पाहता ऑक्टोबरच्या २० व्या तारखेस त्याने कूच करण्यास सुरुवात केली. कॅ. अमुंडसेनचे नशीब बलवत्तर होते यात शंका नाही. कारण, जरी आरंभी आरंभी थंडीवाऱ्यापासून थोडाबहुत त्रास त्याला सोसावा लागला, तरी एकंदरीत या वेळची येथील हवा त्याला अनुकूल होती ही विशेष नवलाचीच गोष्ट होय! त्याने आपल्याबरोबर पाच सोबती आणि सुमारे पन्नास हिम-कुत्री घेतली होती. यांपैकी कोणालाच विशेष त्रास झाला नाही. उलट, जो जो ते ध्रुवबिंदूच्या जवळजवळ येऊ लागले तो तो तेथील हवा त्यांना विशेष आल्हादकारक अशीच वाटू लागली. जवळ जवळ दीडदोन महिने याप्रमाणे एका अर्थी सुखाचा आणि उत्साहपूर्ण असा प्रवास केल्यावर कॅ. अमुंडसेन याच्या आयुष्यातील एक सोन्याचा दिवस उजाडला! * ता. १४ डिसेंबर १९११ हा तो दिवस होय. या दिवशी ज्याप्रमाणे त्याच्या अंतर्यामी उत्साह, उमेद आणि आनंद यांच्या ऊर्मी उसळत होत्या त्याचप्रमाणे बाहेरचे वातावरण आल्हादकारक असेच होते. 'सर्वत्र सूर्याचा सौम्य प्रकाश पसरला असून प्रशांत वातावरणातून मधूनमधून मंद मंद वायुलहरी वाहत आहेत' असे या दिवसाचे त्याने स्वतः वर्णन केलेले आहे. अमुंडसेनचे हे अपूर्व भाग्यच नव्हे तर काय?

ध्रुवबिंदू दोन तीन मैलांच्या आंतबाहेर होता. हा दिवस उजाडताच भराभर थोडासा फराळ उरकून आमचे प्रवासी मोठ्या उल्लसित आणि

* दिवस उजाडला म्हणजे ती तारीख आली. बाकी ज्या ध्रुव-बिंदूवर कॅ.अमुंडसेन उभा राहिला त्या ठिकाणी सहा महिन्यांचा एक सलग दिवस असतो, हे विसरता कामा नये.



पोलहीम येथील कॅ. अमुंडसेनची राहुटी

उत्कंठित अंतःकरणाने तातडीनेच निघाले. कोणी कोणाशी बोलत नव्हता. जो तो आपापल्या मनात आता निश्चित यश मिळणार यामुळे झालेल्या हर्षातिरेकाने एकाच विचारात गुंग झाला होता. अखेरचा क्षण अगदी जवळ आला. प्रवाशांनी सभोवती दृष्टी टाकिली. ध्रुवबिंदूवर इतर कोणत्याही राष्ट्राचे निशाण लाविलेले नाही याची त्यांनी एकवार खात्री करून घेतली. ती खात्री होताच कॅ. अमुंडसेन याने आपल्या सर्व सोबत्यांसह आपल्या राष्ट्राचे निशाण आनंद, आदर आणि अभिमान यांनी युक्त अशा गंभीर मनाने रोविले व आपल्या प्रिय राजाच्या नावाचा त्रिवार जयजयकार केला ! ज्या पठारावर दक्षिण ध्रुवबिंदू स्थिर आहे त्या सर्व पठारास " राजा सप्तम हाकान ( Hackan) याचे पठार " असे नावही देण्यात आले. ज्याप्रमाणे उत्तर-ध्रुवबिंदूपासून कोणीकडे गेले असता दक्षिण दिशेकडेच जावयाचे त्याचप्रमाणे दक्षिण-ध्रुवबिंदू सोडून कोणीकडेही जावयाचे म्हणजे उत्तरेकडेच जाणे होय.

थेट ध्रुव-बिंदूवर या लोकांनी एक राहुटी उभी केली आणि त्या ठिकाणास त्यांनी ' पोलहीम ' म्हणजे ' ध्रुवावरील वाडी ' हे नाव दिले. या ध्रुवावरील वाडीत काही दिवस आनंदात घालविल्यावर ही विजयी मंडळी हसत मुद्रेने समाधानाने परतली. मुख्य तळ ७५० मैल दूर होता. ध्रुवबिंदूकडे येताना रोजी सरासरी ३३ मैल चाल पडली होती. परत येताना ही चाल दीडपट होऊ शकली. कॅ.अमुंडसेन यास हे अपूर्व यश सुदैवाने अतिसुलभतेने मिळाले यात शंका नाही. पण उत्तर ध्रुवबिंदू दुसऱ्या व्यक्तीने आधी गाठला म्हणून हताश न होता किंवा मत्सराच्या आहारी न जाता दक्षिण ध्रुवबिंदूकडे एकदम जाण्यात जी त्याने त्वरा व तत्परता दाखविली त्यातच त्याच्या यशाचे बीज नाही काय ?

## कॅ. स्कॉट व त्याचे अनुयायी

याच सुमारास कॅ. स्कॉट आणि त्याचे अनुयायी यांनी दक्षिण ध्रुवबिंदू गाठण्याच्या तयारीने मॅकमुर्डो सामुद्रधुनीवर आपला तळ दिला होता; व तेही ध्रुव-बिंदूच्या मार्गावर होते. जरी कॅ. अमुंडसेन आणि कॅ. स्कॉट यांना एकच ध्येय गाठावयाचे होते, तरी त्यांचे मार्ग मात्र भिन्न होते. शिवाय कॅ. अमुंडसेन याला पहिल्यापासून जो सुमुहूर्त लाभला तो कॅ.स्कॉट यास लाभला नाही. प्रयत्नाप्रमाणेच नशीब म्हणूनही एक काही चीज आहे व तिचे अस्तित्व मान्य करावे लागते ही गोष्ट खरी. मग त्यास कोणी पूर्वपुण्याई म्हणोत अथवा पूर्व-संचित म्हणोत. असो. कॅ. स्कॉट याजवर कसे दुर्धर प्रसंग ओढवले, आणि केवळ नशीब फिरल्यामुळे त्या प्रसंगांतून निसटत निसटत येत असता अखेर त्यातच त्याचा व त्याच्या अनुयायांचा कसा अंत झाला ही हृदयद्रावक कहाणी आपण आता ऐकू.

कॅ. स्कॉट हा आपल्या 'टेरा नोव्हा' नावाच्या अतिशय दणकट अशा जहाजातून ता. १९ जून १९१० रोजी इंग्लंडाहून निघाला. याच सुमारास अमेरिकेतील संयुक्त संस्थाने, जर्मनी इत्यादी इतर राष्ट्रांकडून दक्षिण-ध्रुव बिंदूवर आपल्या राष्ट्राचे निशाण प्रथम लावण्याचा मान मिळविण्याचे प्रयत्न चालू होतेच. पण कोणासही कॅ.अमुंडसेनाचा बेत माहीत नव्हता.

कॅ. स्कॉटची तयारी मात्र सर्वांगपरिपूर्ण होती. एवढेच नव्हे तर हातचे यश जाऊ नये म्हणून त्याने दुहेरी तिहेरी तयारी केली होती. ज्याप्रमाणे त्याने आपल्याबरोबर एक हिमकुत्र्यांचा तांडा घेतला होता त्याप्रमाणेच एक काटक अशा तट्टांचाही तांडा घेतला होता. निष्णात मजूर तर होतेच. शिवाय रुळाप्रमाणे रुंद चाकाच्या मोटारीही त्याने घेतल्या होत्या. तंबू, राहुटया, अन्न आणि इतर उपयुक्त व आवश्यक जिन्नस यांचा इतका भरपूर साठा होता की, कितीही दिवस मोडले तरी त्याचा तुटवडा पडू नये

अशी त्याची अपेक्षा होती. स्कॉट प्रयत्नवादी होता; आणि म्हणूनज नशीब आडवे येऊ नये म्हणून त्याने आपल्या पूर्वानुभवाचा फायदा घेऊन, या भागातील प्रवासात येणाऱ्या एकूणएक अडचणी लक्षात आणून सर्व प्रकारची जय्यत तयारी केली होती.

१९१० सालच्या डिसेंबर महिन्यात स्कॉट व त्याचे अनुयायी मॅकमुर्डो उपसागराच्या किनाऱ्यावर दाखल झाले. तेथे त्यांना मुख्य तळ घावयाचा होता. १९११ चा हिवाळा येथील सर्व प्रकारची व्यवस्था करण्यात घालवून १९११ च्या उन्हाळ्याच्या सुरुवातीस ध्रुवबिंदूकडे कूच करावयाचे असे त्यांनी ठरविले होते. तोपर्यंत 'टेरा नोव्हा' जहाजाने किनाऱ्याकिनाऱ्याने काही काही भागाचा जास्त शोध लावला आणि मग त्या जहाजास परत पाठविले. मध्यंतरी अशी एक गंमत झाली की, अमुंडसेन याने उत्तर ध्रुवबिंदूकडील आपला मोर्चा फिरवून दक्षिण ध्रुव-बिंदूकडे केलेले कूच जरी इतर राष्ट्रांना माहित नव्हते, तरी ता. ४ फेब्रुवारी १९११ रोजी 'टेरा नोव्हा' व 'फ्रॅम्' या दोन गलबतांची दृष्टादृष्ट झाली या भागात 'फ्रॅम्' गलबत पाहून कॅ. स्कॉटला फार आश्चर्य वाटले. तो कदाचित मनात किंचित कचरलाही असेल. पण त्याने या गोष्टीकडे विशेष लक्ष दिले नाही. त्याला कदाचित असेही वाटले असेल की, कॅ.अमुंडसेनला जरी उत्तर महासागराची भरपूर माहिती असली तरी दक्षिण ध्रुवप्रदेश व तेथील अडचणींची तितकीशी माहिती असणे शक्य नाही आणि यामुळे त्याच्याशी स्पर्धा करण्याचे आपणास कारणच पडणार नाही.

१९११–१२ च्या उन्हाळ्यास सुरुवात होताच कॅ. स्कॉट व त्याचे सहकारी आपले ध्येय गाठण्यास निघाले. कॅ. स्कॉटचे दैव सुरुवातीपासूनच त्याला प्रतिकूल होते हेच खरे. तथापि त्याचे सहकारी मित्र मात्र त्याच्या जिवाला जीव देणारे निस्सीम भक्त होते. डॉ. ई. ए. विल्सन,

ले. एच. आर. बॉवर्स, कॅ. एल. ई. जी. ओटस, आणि पेट्टि ऑफिसर इव्हॅन्स हे त्याचे एकनिष्ठ, अनुभवी, आणि उत्साही साहाय्यक तरी काय करणार? धुके सर्वत्र घनदाट पसरलेले असावयाचे, सोसाट्याचा वारा सदा सुटलेला असावयाचा व पायाखालील बर्फाच्या फरशा एकदम फुटावयाच्या, यामुळे चाचपडतच त्यांना मार्ग काढावा लागे! अशा घातकी प्रदेशात स्कॉटने आपल्या बरोबर घेतलेल्या तट्टांचा उपयोग होण्याऐवजी पावलोपावली त्यांचा अतिशय अडथळा मात्र होऊ लागला. स्कॉटला आपण तट्टे बरोबर घेतली ही मोठीच चूक केली असे अनुभवांती आढळून आले. तज्ज्ञांचे तर असे मत आहे की, स्कॉटचा नाश या तट्टांनी केला. पण हे तज्ज्ञांचे मत चूक घडून गेल्यानंतरचे होय! हे मत चूक होण्यापूर्वी दिले गेले असते तर बरे झाले असते. रुंदचाकी मोटारीचांही त्याला व्हावा तसा उपयोग झाला नाही. तेव्हा नेहमीच्या पद्धतीला अनुसरून सर्व ओझे मनुष्यांनाच वाहून नेणे भाग पडले. ता. ३ जान्युआरी १९१२ रोजी त्यांनी आपल्या इतर सोबत्यांचा निरोप घेतला आणि ते पुढच्या प्रवासास लागले. पंधरा दिवसात आपण ध्रुव-बिंदू गाठू असा त्यांचा अंदाज होता; आणि खरोखर या अंदाजा-प्रमाणे कॅ. स्कॉट व त्याचे सहकारी ता. १८ जान्युआरी १९१२ रोजी ध्रुवबिंदूपाशी आलेही. पण ते समोर नजर टाकतात तो ध्रुवबिंदूवर कॅ. अमुंडसेन याची राहुटी आणि त्या राहुटीवर फडकणारे विजयशाली नॉर्वे देशाचे निशाण पाहून त्यांचा हर्ष पार मावळला! त्या राहुटीवर '९० व्या अक्षवृत्तावर आपले सुस्वागत असो!" असे स्वागतपर 'वाक्य अमुंडसेन याने लिहून ठेविले होते. अमुंडसेन याने त्या राहुटीच्या आत काही वस्तूही ठेविल्या होत्या. त्यातच एक पत्र होते. मागून जे कोणी येतील त्यांनी "हे पत्र आपल्या प्रिय 'हॉकान' राजाकडे पोहोचते करावे," अशी त्या पत्राला विनंती जोडली होती. ते पत्र कॅ.स्कॉट याने आपल्या बरोबर घेतले.

आपले यश दुसऱ्या एका अनपेक्षित साहसी मनुष्याने हिरावून नेलेले पाहून काहीसे दुःखीकष्टी, काहीसे निरुत्साह होऊन, जड अंतःकरणाने ते तेथून परतले. तरी पण त्यांच्यावरील आपत्ती वाढतच होत्या. उन्हाळ्याचा भर होता. तरी थंडीचा कडाका कमी नव्हता. सोसाट्याचा वारा वाहतच होता. पायाखाली ठिसूळ बर्फाच्या राशी पसरल्या होत्या आणि भरीला निरुत्साह. या गोष्टीच्या समुच्चयामुळे त्यांना धड चालवेना त्यातून गाड्या लोटीत न्यावयाच्या. कष्ट सहन न होऊ लागल्यामुळे व नाउमेद झाल्यामुळे एडगर इव्हॅन्स मागे मागे पडू लागला. त्याचा शक्तिपात इतका झाला की, ता. १७ फेब्रु. १९१२ रोजी 'बियर्ड मियर' हिमनदीवरून कष्टाने जात असता तो घसरून पडला आणि तेथेच त्याचा अंत झाला ! या हिमनदीवर मरण पावलेला हाच पहिला नर-वीर होय.


थंडीचे मान सपाट्याने वाढू लागले. वादळी हवेचा वाढता जोर सुरू झाला. गारांचा वर्षाव होऊ लागला. त्यामुळे एके दिवशी ओटसचे पाय अगदीच गळले. त्याला चालवेना. एक पाऊल पुढे टाकावयाचे म्हणजे त्याला मरणप्राय दुःख व्हावयाचे. त्यापेक्षा मरण काय वाईट ! त्याने मनाचा हिय्या केला; आणि मरणाचा बेत मनात कायम करून एके दिवशी भल्या पहाटे उठून त्याने आपल्या उरलेल्या सोबत्यांचा निरोप घेतला. 'मी बाहेरून जाऊन येतो' एवढेच तो उद्गारला; आणि धुक्याने वेढलेल्या वातावरणात तो जो कुठे निघून गेला तो परत आलाच नाही ! हिमनदीच्या खोऱ्यात आपल्या सोबत्यांना भार होऊ नये म्हणून त्याने हिमसमाधी घेतली असावी ! केवढा हा मनाचा मोठेपणा !

कॅ. स्कॉट, डॉ. विल्सन् आणि ले. बॉवर्स जड अंतःकरणाने परतीची वाट चालू लागले. अद्यापि त्यांना मुख्य तळावर यावयास शेकडो मैलांचे

अंतर तोडावयाचे होते. वादळाचा जोर तर सारखा वाढतच होता. वाळवंटातून प्रवास करणाऱ्यांच्या नाका-कानात, डोळ्या-तोंडात, जोड्या-अंगरख्यात वादळी वाऱ्यामुळे ज्याप्रमाणे वाळूच वाळू घुसते, त्याप्रमाणे यांच्या सर्व शरीरावर हिमस्फटिकांचा वर्षाव होई. ते त्यांच्या शरीरात तीक्ष्ण बाणाप्रमाणे रुतत. त्यांना कैक वेळा धड श्वासोच्छ्वासही करणे कठीण जाई. त्यामुळे वाट संपता संपेना. ते रोज अती कष्टाने वाट चालतच होते. एके दिवशी तर ते एका अन्नसामग्रीच्या प्रमुख एक टनी ( One Ton Camp ) टप्प्यापासून सारे दहा बारा मैलावरच होते, पण त्यांच्या नशिबी उपाशी मरण लिहिले होते ! म्हणून वादळाने इतकी उचल केली की, त्यांना आपला पुढचा मार्ग थांबवून आपली राहुटी मोठ्या प्रयत्नाने उभी करावी लागली आणि तिच्यात स्वस्थ पडून राहावे लागले. दोन फार झाले तर तीन दिवस जेमतेम पुरेल एवढेच अन्न त्यांच्यापाशी शिल्लक होते. चारपाच दिवस झाले तरी वादळाचा जोर कमी होईना. यामुळे भुकेने त्यांचा जीव व्याकुळ होऊ लागला. ते तसेच निःशक्त होऊन निपचित पडून होते. वादळ सुरू होण्याच्या आधी ते जरी एक दिवस एकटनी टप्पा गाठते तरी ते स्वदेशी सुरक्षित परत आले असते. वादळास नऊ दिवस झाले. ते मरणोन्मुख होऊन आपल्या राहुटीत मृत्यूची वाट पाहत होते ! डॉ विल्सन् आणि ले. बॉवर्स यांचे प्राणोत्क्रमण झाले; आणि कॅ. स्कॉट दोघा सोबत्यांच्या शवाशेजारी आपल्या मरणाची आराधना करीत पडून होता ! शेवटी तोही क्षण आला. निजल्या निजल्याच त्याने आपला हात लांबवून आपल्या प्रिय मित्राच्या ( डॉ. विल्सनच्या ) शवावर टाकून ठेविला, आणि त्याच स्थितीत ता. २९ मार्च १९१२ रोजी त्याने इहलोकची यात्रा संपविली ! हे तीनही मृत देह त्या ठिकाणी कित्येक दिवस त्या राहुटीतच पडून होते. जगाला त्यांचा पत्ता नव्हता !

हे प्रवासी रोज आपली दिनचर्या लिहून ठेवीत. स्कॉटने आपल्या दिनचर्येत या सर्व भयाण करुण प्रसंगाचे अत्यंत हृदयस्पर्शी असे वर्णन लिहून ठेविले होते. हे असे व्हावयाचे, असे जगदीशानेही आपल्या दिनचर्येत लिहून ठेविले असावे, असे वाटते. कारण, ज्या स्थळी यांना मृत्यू आला त्या स्थळाच्या अलीकडच्या टप्प्यावर सारे दहा दिवस अगोदर त्यांच्या शोधार्थ मूळ तळावर राहिलेल्या त्यांच्या सोबत्यांपैकी काही सोबती येऊन गेले होते. पण वादळाचा रंग पाहताच ते तेथेच भरपूर अन्न ठेवून परत फिरले होते. एकच टप्पा चुकला. यात दोष कोणाचा?

या वीर पुरुषांची एक गोष्ट मात्र अत्यंत कौतुकास्पद वाटते. ते साहसी प्रवासी तर होतेच, शिवाय शास्त्रज्ञही होते. आणि एका अर्थी यामुळेच त्यांना असे मरण आले. कारण, ध्रुवबिंदूवर पोहोचल्यावर जरी त्यांचा एका बाबतीत अत्यंत हिरमोड झाला होता, तरी तेथून थेट परत न येता, तेथील भूपृष्ठात आढळणाऱ्या अनेक खनिज वस्तू जमा करण्यात त्यांनी वेळ घालविला; आणि त्यांचे ओझे त्यांनी आपल्याबरोबर घेतले. त्या वस्तू बरोबर घेण्याचा त्यांना मोहच पडला. या वस्तूंत दगडी कोळसा, दगडांशी एकजीव झालेले तुकडे, लाकडाचे पोवळ्यांचे सांगाडे आणि इतर अपूर्व खनिज पदार्थ त्यांनी आपल्या गाड्यांतून खच्चून भरले, पृथ्वीची उष्णता कमी होण्याच्या आधी या ठिकाणी वनस्पती वाढत असत. मूळ उष्णता कमी झाल्यावर या ठिकाणी हिमप्रलय झाला. त्यामुळे तेथील अरण्ये हिमराशीखाली गाडून गेली, हीच गोष्ट सिद्ध करण्याकरिता त्यांना या वस्तू आपल्या बरोबर घेण्याचा मोह झाला पण या मोहात त्यांचे मरण होते, हे तरी त्यांना काय माहीत! कारण, या वस्तूंनी भरलेल्या गाड्या ओढून नेण्यात त्यांना जिवापाड श्रम पडले, जास्त दिवस लागले, आणि शेवटी उपाशी मरण्याची त्यांच्यावर पाळी आली.



हे तीनही मृत देह त्या ठिकाणी कित्येक दिवस त्या राहुटीतच पडून होते. जगाला त्यांचा पत्ता नव्हता !

१९१२ च्या ऑक्टोबर महिन्यात त्यांच्या शोधार्थ डॉ. ॲटकिन्सन, मि. चेरी गॅरॅड आणि मि. सी. एस. राइट हे तिघे गेले असता त्यांना ता. १२ नोव्हेंबर १९१२ रोजी त्या भयाण प्रदेशात या लोकांचा तो एकाकी तंबू. त्यात जणू गाढ झोपेत शेजारी शेजारी पडून असलेली त्यांची शवे, आणि तंबूच्या बाहेर खनिज पदार्थांनी भरलेल्या गाड्या आढळल्या. तंबूत कॅ. स्कॉटने व इतरांनी लिहिलेली दिनचर्येची पुस्तके सापडल्यामुळे हा वृत्तांत जगास कळला. शेवटी शोधार्थ गेलेल्या लोकांनी अत्यंत दुःखी अंतःकरणाने त्यांच्या शवांवर हिमराशींची थडगी रचून त्यांचा अखेरचा निरोप घेतला. आजही ती त्यांची थडगी त्या हिममय प्रदेशांत हिमकणांचा अखंड वर्षाव घेत आहेत !

REFBK-0017232
REFBK-0017232